# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २३/०८/२००५

आज दि. २३/०८/२००५ रोजी दि. १२/०८/२००५ व दि. १७/०८/२००५ रोजीची मिरा भाईंदर महानगरपालिकेची तहकूब झालेली महासभा दुपारी ०२.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. ०४/०८/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ७) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ८) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ९) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १०) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ११) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १४) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १५) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १९) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २१) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २२) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २३) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २४) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २५) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २६) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| २७) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| २८) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २९) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३०) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३१) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३२) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३३) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३४) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३५) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | सदस्य |
| ३६) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३७) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ३८) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३९) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४०) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४१) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ४२) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४३) | श्री. जेम्स कोलासो इजिदोर | सदस्य |
| ४४) | श्रीम. भानु भगवान पाटील | सदस्या |
| ४५) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ४६) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४७) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ४८) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ४९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५०) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५१) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५२) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५३) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५६) | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू | सदस्य |
| ५७) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५८) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५९) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६०) | श्री. रमेश धरमचंद जैन | सदस्य |
| ६१) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६३) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६४) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## <u>गैरहजर सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| २) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| ४) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ५) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| ६) | श्री. ओमप्रकाश गंगाधरजी अग्रवाल | सदस्य |
| ७) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| ८) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| ९) | श्री. हंसुकुमार पांडे | सदस्य |
| १०) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १२) | श्रीम. सुरेश यशवंत गायकवाड | सदस्या |
| १३) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| १४) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| १५) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| १६) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| १७) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| १८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १९) | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| २०) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, सभेला सुरुवात करण्यापुर्वी मी मागील तीन प्रश्न प्रशासनाला विचारले होते. त्याचे उत्तर अद्यापपर्यंत मिळालेले नाही. तरी त्याबाबत शासनाने खुलासा करावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा विषय कुठला होता ते सांगा.

**शशिकांत भोईर :-**

विषय (१) जे कर्मचारी मिरा भाईंदर महापालिकेच्या विरुद्ध पदनियुक्ती आणि सेवाजेष्ठतेसाठी कोर्टात गेलेले आहेत. त्याच्या संदर्भात एक प्रश्न विचारलेला होता. ते तीन कर्मचारी होते. ते कर्मचारी प्रथम तात्पुरत्या स्वरुपात नगरपालिकेत कार्यरत होते. नंतर त्यांची सरळसेवेने भरती करण्यांत आली. त्यांची सेवाजेष्ठता तात्पुरती नेमणुक जेव्हा ठेका पद्धतीने होती, त्या काळात घेतलेली होती. ती योग्य आहे की अयोग्य आहे? याबाबत मुद्दा होता. तसेच आपल्या महापालिकेच्या विरुद्ध ते लोक कोर्टात गेले. कोर्टात जाऊन ते आपल्या महापालिकेच्या विरुद्ध जिंकलेसुद्धा. तसेच, ते जिंकल्यानंतर दुसरे कर्मचारी त्यांच्या विरुद्ध परत कोर्टात गेले. ते जिंकले. या प्रकरणात आमच्या पाठिमागे लागण्याची नक्की त्यांची काय भुमिका आहे. आपण त्यांचा रेकॉर्ड मागवून मला संपूर्ण खुलासा करणार होतात. तो अजुन झालेला नाही. तरी आता मिटींग सुरु झालेली आहे तर मला खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल, तोपर्यंत पुढील विषय घेण्यांत यावा. अधिकारी आल्यानंतर आपल्याला प्रश्नाचे उत्तर मिळेल.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २८ चे वाचन केले.)

**नरेंद्र मेहता :-**

(ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी आल्मेडा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा जो ठराव आलेला आहे तो एका नागरिकाने दिलेला आहे. सन्मा. सदस्य एडविन घोन्सालवीस यांनी तो ठराव दिलेला आहे. याचा कोणीही नागरिक असो एखादा ठराव बाहेरुन देईल. आपण तो महासभेत घ्यायचा का?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. पालकमंत्र्यांना त्यांनी तसे निवेदन दिलेले होते. मला वाटते की, जे काम तुम्हा आम्हांला करायला पाहिजे होते ते एका सामान्य माणसाने केलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पालकमंत्र्यांची ह्याच्यामध्ये शिफारस नाही. हा ठराव महासभेत घ्या अशी पालकमंत्र्यांची शिफारस आहे का? एक कोणी नागरिक येतो, ॲप्लीकेशन करतो. एखाद्या मंत्र्याकडे जातो, आपण ते ॲप्लीकेशन या ठिकाणी स्विकारतो काय आणि महासभेला तो ठराव घेतो काय. हे योग्य आहे का? तुम्ही नगरसेवकांनी कोणी ठराव आणला असता तर आम्ही बोललो असतो की, हा ठराव नगरसेवकांनी आणलेला आहे.

**आसिफ शेख :-**

आपले प्रशासन केवढे पारदर्शक आणि स्वच्छ आहे. नागरिकांच्या भावनांचा केवढा आदर करते हे आपण या ठरावाद्वारे सिद्ध केलेले आहे. आपण काम केले पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग लोकप्रतिनिधींचे काय काम आहे. पब्लीकने सगळे चालवायचे.

**आसिफ शेख :-**

त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी एक चांगली सुचना केलेली आहे. आपण मान्य केलेली आहे. आपण या ठिकाणी ठराव केलेला आहे. जेव्हा-जेव्हा नागरिक लोकहितासाठी चांगल्या सुचना करतात आपण त्याचे नेहमी स्वागत करतो. आपण या ठिकाणी चांगला निर्णय घेतलेला आहे. त्यांच्यानंतर त्यांना विरोध करण्याचे काय कारण आहे. तुमचा विरोध आहे. तुम्ही सांगा आमचा विरोध आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही निर्णयाबद्दल काहीही बोलत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम, आमचा निर्णयामध्ये वाद नाही. परंतु, ज्या पद्धतीने हा ठराव आलेला आहे ह्याला आमचा विरोध आहे. जर पालकमंत्र्यांनी आदेश दिलेला असेल तर आम्ही समजू शकतो. परंतु, एक साधा नागरिक

एखाद्या मंत्र्याला लेटर लिहितो आणि आपण महासभेत घेतो हे योग्य आहे का? सचिव साहेब, आपण असे घेऊ शकतो का?

**मा. महापौर :-**

ह्या विषयावर प्रशासनाचा गोषवारा आहे. आपण तो गोषवारा बघा. आपल्या विषयपत्रिकेवर असेल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम मला असे बोलायचे आहे की, एखादा नागरिक......

**मा. महापौर :-**

आपण विषय घेऊ शकतो. प्रशासनाने त्यांच्याकडून गोषवारा घेतलेला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपले काय काम राहिलेले नाही. हा सगळा व्यवहार पब्लीकने करायचा मग आपल्या बॉडीची काय किंमत आहे. प्रशासनाने द्यायचे, नागरिकांनी द्यायचे आम्ही मात्र या ठिकाणी ठराव पास करायचा. मग आपली काय किंमत आहे? आपले काय राहिले? आपण काय कारभार करतो? एखादा जर करत असेल, प्रशासनाच्या ह्याच्यावर तर आपले काय राहिले?

**मा. महापौर :-**

तो विषय मंजुर करण्यासाठी महासभेत ठेवलेला आहे. आपली सुचना समजलेली आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, हम लोग जो प्रश्न पुछते है वह प्रश्न दो-तीन साल तक पेन्डींग रहता है। उसमे नगरपालिकाका महसुल कम होता है। वह जो ठराव आया है, वह खराब नही है, अच्छा है। कोई भी नागरिक ऐसा ठराव लाएगा तो आप उसको सदनमे लेंगे क्या?

**मदन सिंग :-**

आप लोग नगरसेवकांके ठराव नही लेते है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

नगरसेवकोंके ठराव नही लेने के ऐसे है क्या?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आमचा प्रस्ताव महत्वाचा विषयावर आला तर तुम्ही फेटाळता आणि तुम्ही महत्वाच्या विषयावर आमची लक्षवेधीसुद्धा फेटाळता. ज प्रस्ताव फेटाळता. आज नागरिकांनी लिहिलेल्या पत्रावर तुम्ही चर्चा करता. चांगली गोष्ट आहे. तुमच्या स्वतःच्या पक्षाचासुद्धा माणूस आहे.

**लिला पाटील :-**

(ठरावाचे वाचन केले.)

**सुधा गोयंका :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सचिव साहेब, असा कोणी एखादा नागरिक अर्ज करेल तर तो ठराव घेऊ शकतो का? मला तुमच्या तोंडून ऐकायचे आहे.

**प्र. सचिव :-**

प्रशासनाकडून विषय माझ्याकडे आलेला आहे. मा. आयुक्त साहेबांचा गोषवारा सोबत जोडलेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. आयुक्त साहेबांनी टिपणी दिलेली आहे. गोषवारा दिलेला नाही. तुम्ही विषयपत्रिका बघा.

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्त साहेबांनी टिपणी दिलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझा प्रश्न असा आहे की, एखादा नागरिक मंत्र्याला अर्ज करतो तो विषय आपण ह्या सभेमध्ये घेऊ शकतो का?

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्त साहेबांकडून मुळ टिपणीप्रमाणे विषय घेऊ शकतो. ते मा. महापौरांचे अधिकार आहेत.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, मा. पालकमंत्र्यांनी एक विषय आणल्यानंतर तो विषय घ्यायचा की नाही. विषय घ्यायला कोणत्याही तऱ्हेची हरकत नसावी. ज्या-ज्या वेळेस आपल्याला पालकमंत्र्यांची गरज लागते आपण त्या-त्या वेळेस आपल्याला कामासाठी महापालिकेच्या कामासाठी आपण पालकमंत्र्यांकडे धावत जातो. आपण तेव्हा हा विचार करित नाही की, आम्ही पालकमंत्र्यांकडे धावत जातो. आपण तेव्हा हा विचार करीत नाही की, आम्ही पालकमंत्र्यांकडे कशाला जाऊ. आताच परिवहन सेवेचा विषय झाला. मला वाटते की,

आपल्याला याबाबतीत जास्तीत जास्त पालकमंत्र्यांचे सहकार्य झालेले आहे. मा. पालकमंत्र्यांनी मा. आयुक्त साहेबांनी हा विषय सांगितला आहे की, अशा तऱ्हेची नागरिकांची सुचना माझ्याकडे आलेली आहे. आपण या सुचनेसाठी काय करु शकतो. अशी विनंती केलेली आहे. त्याच्यामुळे त्याच्यावर मोठी काही चर्चा करण्याची गरज नाही. फक्त एवढाच प्रश्न आहे की, पहिला जो ठराव झाला त्याच्यामध्ये रु. १००/- घ्यावे असे ठरावामध्ये नमुद केलेले आहे. रु. १००/- आणि रु. १,०००/- याच्यामध्ये खुप मोठी तफावत होती. म्हणजेच ते फक्त दहा टक्के झाले. मी विनंती करतो की, पहिल्या ठरावामध्ये थोडीशी दुरुस्ती करुन आपण ती रु. ५००/- करावी. भिवंडी महानगरपालिकेने रु. ५००/- केलेले आहेत. त्याच्यामुळे आपल्या महापालिकेच्या उत्पन्नातसुद्धा थोडी भर पडेल. आपण दोन्ही गोष्टीमध्ये समतोल साधत आहात. रु. १००/- म्हणजे अगदीच कमी झाले. रु. ५००/- होईल, लोकांना काही वाटत नाही. माझी त्याच्यामध्ये सुचना आहे की, आपण ह्याच्यावर विचार करावा.

**लिला पाटील :-**

सचिव साहेब, मी दिलेल्या ठरावाचे वाचन करा आणि मा. महापौरांना त्याच्यावर रुलिंग देऊ द्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी दुरुस्तीची सुचना मांडलेली आहे. त्यास माझे अनुमोदन आहे. रु. ५००/- घेण्यांत यावे.

**जयंत पाटील :-**

ते ठरावामध्ये ॲड करुन घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठराव काय मांडतात, दुरुस्ती काय झालेली आहे, सुचक काय झालेला आहे, अनुमोदन काय झालेले आहे, नियम काय झालेला आहे. सगळे मासळी बाजाराचे काम चाललेले आहे. मा. सभापती मॅडम, आमच्या आघाडी पक्षातर्फे आम्ही एक ठराव दिलेला आहे. या ठिकाणी दोन ठराव आलेले आहेत. दोन्ही ठरावाचे वाचन करावे. आपल्याला त्याच्यामध्ये कायदेशिर बाबी पडताळून जे योग्य वाटते ते करावे. वाटल्यास आपण तो मतदानाला घ्यावा. कारण या ठिकाणी जे चाललेले आहे त्याबाबत एक ठराव मांडतो. त्याच्यावर लगेच दुरुस्ती सुचवितात. त्याच्यामुळे त्यांच्या ठरावामध्ये त्याला कायदेशिर किती व्हॅल्यु आहे हे तेच सांगतात. रु. १००/- करुन ते रु. ५००/- वर करतात आणि प्रत्यक्षात खरे म्हणजे तुम्ही हा विषय आणलेला आहे. हा विषय चुकीचा नाही. पालकमंत्री असू दे किंवा एक छोटासा नागरिक जरी असला. त्यांने जरी आपल्याला विनंती केली. आपल्याला त्या विषयामध्ये वैशिष्ट वाटले, ग्रॅव्हिटी वाटली तर तो विषय आणण्याचा आपला अधिकार आहे. विषय आणण्यामध्ये काहीही चुक झालेली नाही, हे मी या ठिकाणी स्पष्ट करतो. परंतु, आपण जेव्हा ज्या विषयावर एखादा ठराव घेतो, जेव्हा महासभेने ह्याचे ठरावसुद्धा या विषयावर केलेले आहेत, काही नियमावली बनविलेल्या आहेत, त्यांना ह्या नियमावलीचा विसर इतक्या लवकर पडतो का? गेल्या सभेमध्ये किंवा ह्या सभेमध्ये आपण विकास नियंत्रण नियमावलीचा इतिवृत्तांत मंजूर केला. त्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये या झोन दाखल्याच्या संदर्भात किती चार्ज शुल्क आकारावे हे स्पष्ट केलेले आहे. तुम्ही एवढ्या लवकर कसे विसरले. आम्ही ठराव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये जितके शुल्क आकारायचे आहे तितकेच आकरण्यात यावे. जर त्याच्यामध्ये बदल करायचा असेल तर विकास नियंत्रण नियमावलीतच अख्खा बदल करण्याचा विषय आपल्याला आणावा लागेल. म्हणजे आम्ही जे कायदे केले ते आम्ही आजच पायदळीत तुडवायचं ही भुमिका घेतली आहे. कृपया त्यांनी आपली मेमरी जरा रिकॉल करावी की, तुम्ही सभागृहामध्ये सभागृहामध्ये सत्ताधारी पक्ष आहात. तुम्ही एखादा विषय आणता, तुम्ही त्याच्यावर ठराव करता, त्याचे इतिवृत्तांत मंजुर होते. लगेच दुसऱ्या सभेमध्ये एकदम त्याच्या विरोधात ठराव आणून कसे चालेल. कृपया आमचा ठराव वाचा. त्याच्यावर नगररचनाचे कायदेशिर मत घ्या की, अशा प्रकारे नियंत्रण नियमावलीमध्ये दुरुस्ती केलेली होती की, नाही. मग त्याचा निर्णय घ्या. विधी अधिकारी या सभागृहात आल्याबद्दल आपण सर्वांनी स्वागत करायला पाहिजे. बहुतेक ही त्यांची शेवटची सभा पाहिजे.

**साळवे :-**

ही सभा सुरु होण्यापासून तुम्ही असे बोलत राहिलात तर मला बोलणे अशक्य होईल. ही सभा सुरु होण्यापासून मी इथे उभा आहे. इथे समोर बसलेला आहे.

**जयंत पाटील :-**

आम्ही तुमचे नांव पुकारलेले होते का?

**साळवे :-**

मला जोपर्यंत या चेअरचे मुख्य बोलवत नाही तोपर्यंत मी या ठिकाणी येऊ शकत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही तुमचे नांव पुकारलेले होते का? तुमचे नांव पुकारलेले नाही. मग तुम्ही कसे आले? तुम्ही कोर्ट चालवायचे होते.

**साळवे :-**

मी इथे आल्याबद्दल तुम्हांला काही वाईट वाटले का? तसे असेल तर सांगा.

**रोहित सुवर्णा :-**

आमच्या सांगण्याचा उद्देश असा आहे की, आम्ही तुमच्या नांवाने साळवे अशी हाक मारलेली नाही. तरी तुम्ही आलात.

**साळवे :-**

तुम्हांला तशी सवय असेल तुम्ही सांगू शकता कारण हे प्रत्येक फॅमिलिच्या आचार विचारावर असते.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्याच्यावर नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी निवेदन करायला पाहिजे. हा विषय नगररचना विभागाशी संबंधित आहे. त्याच्या अधिकाऱ्यांनी ह्या विषयावर निवेदन करायला पाहिजे.

**भोपळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, महासभेने सदर नियमावलीचा इतिवृत्तांत मंजुर केलेला आहे. सदर नियमावली नागरिकांच्या हरकती सुचनांसाठी प्रसिद्ध करण्यांत येईल. त्यानंतर शासनाची मान्यता मिळेल. त्यानंतर ती सुधारित नियमावली मंजुर होईल. दर काय असावे? रु १००/-, रु. ५००/-, रु. १,०००/- असावे हा निर्णय महासभेने घ्यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

विकास नियंत्रण नियमावलीमध्ये जो निर्णय घेतलेला आहे तो बदलायचा का?

**भोपळे :-**

आपण त्याच्यामध्ये रु. ५००/- सजेशन केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्या सभागृहामध्ये ते मंजुर आहे का?

**भोपळे :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्या सभागृहाला ह्या ठरावाद्वारे दुरुस्ती करता येईल का?

**भोपळे :-**

या ठरावाद्वारे दुरुस्ती करता येऊ शकेल. कारण ती नियमावली अजुनपर्यंत मंजुर झालेली नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग ही हरकती, सुचना मागवा. खरे म्हणजे हरकती सुचना मागविल्याशिवाय तुम्ही सुधारणा करु शकत नाही.

**भोपळे :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्या सभागृहाने नियमावलीमध्ये रु. ५००/- करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ती योग्य असेल तर योग्य असे म्हणा नाहीतर दुरुस्ती करायची असेल तर दुरुस्ती करा.

**भोपळे :-**

रु. ५००/- योग्य आहे.

**मोहन पाटील :-**

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता हे सुचक आहेत. त्याच्यामध्ये रु. ५००/- ची दुरुस्ती करण्यांत यावी.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य नरेंद्र मेहतांना विचारा की, त्यांना मंजुर आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

मला रु. ५००/- करणे मंजुर आहे.

**रोहित सुवर्णा :-**

धन्यवाद. नाहीतर ते बोलतील की, मी तर मागे घेतलेला नाही.

**मा. महापौर :-**

सुचक सन्मा सदस्य नरेंद्र मेहता आणि अनुमोदन सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी मांडलेल्या रु. ५००/- चा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे. दुसरा ठराव सन्मा. सदस्या लिला पाटील आणि अनुमोदन सन्मा. सदस्या सुधा गोयंका यांची दुरुस्ती ह्याच्यामध्ये समाविष्ट करुन घेण्यांत येत आहे. ठराव सर्वानुमते मंजुर. सन्मा. सदस्य जयंत पाटील आणि अनुमोदन सन्मा. सदस्य आसिफ शेख यांची दुरुस्ती समाविष्ट करुन घेण्यांत येत आहे. पुढील विषय घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. २८ :-**

मिरा भाईंदर शहरातील मंजुरी विकास योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या झोन दाखल्यासाठी शुल्क आकारणेबाबत.

**ठराव क्र. ३० :-**

आपल्या मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार नागरिकांना लागणारे झोन दाखले घेण्यासाठी यापुर्वी प्रति सर्व्हे रु. १०००/- झोन दाखला फी घेण्यात येत होती. त्याबाबत झोन दाखला फी जास्त असल्याचे व्यक्त झाल्याने ही फी आता कमी करुन प्रति सर्व्हे रु. ५००/- ठेवण्यांत यावी. त्यास हे सभागृह मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता.** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २९ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

(ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या विषयावर माझे मत मांडायचे आहे. त्यावेळेला आपल्या देशामध्ये ७४ अमेंन्डमेंटचे इम्प्लिमेंन्टेशन करण्यात आले. त्यावेळेस शेड्युल १२ मध्ये वॉर्ड कमिटी ज्या ठिकाणी दहा लाखाची वस्ती आहे. ज्या शहराची लोकवस्ती दहा लाखाच्या आसपास असेल त्या ठिकाणी वॉर्ड कमिटी स्थापन करण्यांत यावी. असा आदेश नगरविकास मंत्रालय, नवी दिल्लीने आपल्याला दिलेला होता. वॉर्ड कमिटी १९९२ साली कॉन्स्टीट्युशनला बनविण्यात आले. त्यावेळेचे पॉप्युलेशन लक्षात घेता मार्केट, गार्डन कमिटी, स्लम इम्प्रुव्हमेंट कमिटी, सॉनिटेशन वॉटर सप्लाय कमिटी, युथ कल्चरल अफेअर्स कमिटी, वुमेन ॲन्ड चिल्ड्रेन वेल्फेअर कमिटी, प्लॅनिंग ॲण्ड डेव्हलपमेंट कमिटी, एज्युकेशन हेल्थ कमिटी, ट्रान्सपोर्ट कमिटी अशा पद्धतीने वॉर्ड कमिटीच्या अंतर्गत वार्डच्या कमिटी बरोबर हीदेखील कमिटी स्थापन करावी. आपल्याला असा अधिकार कॉन्स्टीट्युशनने दिलेला होता. मुंबई महानगरपालिकेने कलम ५० टी.टी. अंतर्गत वॉर्ड कमिटीची रचना केली. मिरा भाईंदरमध्ये काही ठिकाणी काही नगरसेवकांचे म्हणणे होते की, दोन-अडीच वर्षापुर्वी या ठिकाणी पाच वॉर्ड कमिट्या पाहिजेत. परंतु, कायद्याने चार होत्या. त्यावेळेला श्री. शिवमुर्ती नाईक साहेब सभागृहाला बोलले की, कायद्याने चारच होणार. परंतु, काही लोकानां पाच पाहिजे होत्या. ती प्रोलॉंग झाली. सुदैवाने अडीच-तीन वर्षाने का ना होवो. परंतु, वॉर्ड कमिटीची स्थापना या महापालिकेमध्ये झाली. २९(अ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) नुसार आपल्याला फक्त वरील विषयाबाबत वॉर्ड कमिटीमध्ये फक्त चर्चा करता येते. रेव्हेन्यु बजेट बनविता येतो. वॉर्ड कमिटीला स्वतंत्र असे कॅपिटल एक्स्पेंडीचर नाही. तो अधिकार फक्त महासभेला आहे. कलेक्टीव्ह व्हिजम चातुर्थ्य किंवा आपल्याला तळागाळातील कार्यकर्त्यांना एन.जी.ओ.च्या तीन सन्मा. सदस्यांना घेऊन त्यांच्याबरोबर जे तळागाळातील प्रॉब्लेम्स असतात, जसे की, सॅनिटेशनचा प्रॉब्लेम आहे, ड्रिकींग वॉटरचा प्रॉब्लेम आहे, गारबेजेसचा प्रॉब्लेम आहे किंवा पर्यावारणाचा काहीतरी वॉर्डमध्ये प्रॉब्लेम असेल. एखादे अधिकृत बांधकाम असेल अशा गोष्टीवर चर्चा करुन ती चर्चा झाल्यानंतर आपण त्या ठिकाणी एखादा प्रस्ताव आणून महासभेपुढे तो ठेवायला लागतो. नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र शासनाने वॉर्ड कमिटीच्या अंतर्गत ७४ अमेंन्डमेंट आणतानादेखील फार मोठा विचार केलेला होता. विचार करतांना एवढेच लक्ष दिलेले होते की, या ठिकाणी कुठेतरी महापालिकेमध्ये, छोट्या नगरपालिकेमध्ये, नगरपरिषदेमध्ये डिसेन्ट्रलायझेशन पॉवर करणे फार गरजेचे होते. डिसेंन्ट्रलायझेशन ऑफ पॉवर्स त्याच पद्धतीने या डिसेंन्ट्रलयझेशन पॉवर करतांना आपल्या पॉवर्स आपल्याला डेलिगेट कराव्या लागतात. आपण ज्या पॉवर्स डेलिगेट करतो त्याबद्दलदेखील आपल्याला अधिकार आहेत. बजेटची प्रोव्हिजन करण्याचा अधिकार आहे. परंतु, त्याच्यासाठी सेपरेट वॉर्ड कमिटीसाठी सेपरेट बजेटची प्रोव्हिजन करण्याचा अधिकार आपल्याला दिला गेलेला नाही वॉर्ड कमिटीच्या पॉवर्सबाबत वॉर्ड कमिटीमधील सन्मा. सदस्य स्वतंत्र निर्णयदेखील घेऊ शकत नाहीत. त्यांना कलेक्टिव्ह डिसीजन घ्यावा लागतो. त्यांना एकत्र तोडगा काढावा लागतो. त्यालाच कलेक्टिव्ह डिसीजन म्हणतात. आपल्याला ते अधिकार फक्त वॉर्ड कमिटी कशासाठी पाहिजे, वॉर्ड कमिटीचे

काय अधिकार आहेत. आपण एन.जी.ओ.ला या ठिकाणी का सामील करुन घेतले. ह्याचे मुख्य कारण होते की, त्या प्रभागातील, त्या वॉर्डमधील ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सेटअप हे बरोबर आहे की नाही ते बघणे. प्रशासनाच्या बाबतीत प्रशासन कसे काम करते. कोणावर अन्याय होतो आहे की नाही ह्या सगळ्या गोष्टीवर चर्चा करुन वॉर्ड कमिटीने महासभेपुढे प्रस्ताव ठेवायचा असतो. त्या ठिकाणी को-ऑर्डीनेशन असणे फार गरजेचे आहे, बिटविन दि वॉर्ड ऑफीसर ॲन्ड दी हेड ऑफ दि डिपार्टमेंन्ट म्हणजे आपल्या मुख्य कार्यालयामधील अधिकारी, वॉर्डमध्ये बसलेले प्रभाग अधिकारी आणि त्यांच्या हाताखालील कर्मचारी त्यांच्यामध्ये को-ऑर्डीनेशन व्हावे म्हणून वॉर्ड कमिटीची स्थापना झाली. उदाहरणार्थ, एखाद्या स्मशानामध्ये लोकांना व्यवस्थित लाकडे मिळाली नाही तर ते मुख्य कार्यालयामध्ये येण्याऐवजी तिकडच्या प्रभाग समितीला भेटू शकतात. तिकडच्या वॉर्ड कमिटीला जाऊन भेटू शकतात. याच्यावर सुप्रिम कोर्टाचे न्यायाधिश श्री. व्यंकट्या यांचादेखील अहवाल मी आपल्यासमोर ठेवू इच्छितो. महासभेचा ठराव करुन वॉर्ड कमिटीला अधिकार देऊ शकतो. परंतु, शासन अशा ठरावाला मंजुरी किंवा मान्यता कधीही देत नाही आणि दिलेली नाही. अशा प्रकारे अधिकार देण्यासंबंधीचा ठराव मुंबई महानगरपालिकेने केलेला आहे. परंतु, आजपर्यंत त्याला राज्यशासनाने परमिशन दिलेली नाही. आपल्याला या गोष्टी पाहिजे तर आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ऑडीटर साहेब मागेच बसलेले आहेत, मी त्यांना सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेचे चीफ ऑडीटर श्री. पी. सी. पिसोळकर साहेब आहेत. वाटल्यास आपण ह्या विषयावर त्यांच्याशी चर्चा करु शकतो. ते नंतर ह्या विषयावर आपले मत मांडतील. दुसरे म्हणजे वॉर्ड कमिटीची काय जबाबदारी आहे. त्या जबाबदारीकडे दुर्लक्ष करुन आम्हांला इतर फक्त रु. ५ कोटीचेच अधिकार द्या. रु. ५ लाख कमी पडतात म्हणून रु. ५ कोटीचे अधिकार द्या. तुम्ही फक्त फायानान्शिअल कंन्डिशन मागवून घ्यावी. तुम्हांला अधिकार सॅंन्क्शन पाहिजे. कामे खुप करावयाची आहेत. उदाहरणार्थ, रिड्रेसल ऑफ दि एमर्जन्सी. आपण अत्यावश्यक सेवांबद्दल चर्चा करा. वॉटर ड्रेनेज, क्लिननेस, स्वच्छता आपण अंदाजपत्रकामध्ये शिफारस करु शकतो. हा देखील अधिकार वॉर्ड कमिटीला दिला गेलेला आहे. प्रशासकीय व आर्थिक मंजुरी फक्त आपल्याला ५ लाखाचा आहे. बजेटमध्ये तरतुद असेल अन्यथा तोही नाही. बजेटमध्ये आहे. आपल्याला वॉर्ड कमिटीला रु. ५ लाखाचे अधिकार आहेत. एखाद्या रस्त्याला नामकरण करायचे असेल तर एखाद्या चौकाला नामकरण करायचे असेल तर आपण ती शिफारस करु शकतो. स्वच्छतेच्या संबंधी काही सुचना असतील त्या आपण महासभेपुढे ठेवू शकतो. मंडई, रस्ता दुरुस्ती प्रस्ताव, शाळेची दुरुस्ती, दवाखाना असेल एखाद्या वेळेस फुटपाथवर अतिक्रमण होत असेल या सगळ्या चर्चा वॉर्ड कमिटीच्या खालच्या लेव्हलला करुन आणायला पाहिजे. वॉर्ड कमिटीने फक्त रेव्हेन्यु बजेटमध्ये वॉर्ड वाईज अलोकेशन करायचा अधिकार आहे. मी तीन मुद्यांवर बोलू इच्छितो की, वॉर्ड कमिटीला फक्त रेव्हेन्यु बजेटमध्ये वॉर्डवाईज अलोकेशन करण्याचा अधिकार आहे. अन्यथा कुठलाही अधिकार दिला गेलेला नाही. मुंबई महानगरपालिकेमध्ये वॉर्डवाईज बजेट छापले जाते. अनफोरसीन फन्ड म्हणून म्युनिसिपल कार्पोरेटर फन्डसंबंधी यात माहितीदेखील असते. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स यांची मदत घेतली जाते. माझी आपल्याकडे नम्र विनंती आहे की, या विषयावर या ठिकाणी कायदातज्ञ बसलेले आहेत. चीफ ऑडीटर या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांनी निवेदन करावे की, मी बोललो हा विषय कायदेशिर आहे की, मी कायद्याच्या पलिकडे काहीतरी बोललो. तरीदेखील मी आपल्याला सांगतो की, मुंबईने जरी वॉर्ड ॲलोकेशन केलेले आहे, आमच्या प्रत्येक नगरसेवकाकडे छापून माहिती दिलेली आहे. आपण तशा पद्धतीने फन्ड ॲलोकेशन करण्याचे वॉर्डवाईज करावे. असे माझे आपल्यासमोर निवेदन आहे. मा. महापौर मॅडम, लिगल ॲडव्हाइजरदेखील आहेत. त्यांनी आपल्यासमोर निवेदन ठेवावे. तो विषय परत दोन-तीन तास चर्चा करण्यांत काहीही अर्थ नाही. ते बोलतील कायद्यामध्ये तरतुद आहे की नाही. महापौर मॅडम, आजसुद्धा आपला विषय असाच पोस्टपोन होईल. मी कायद्याला धरुन बोललो आहे. याला परफेक्ट उत्तर चीफ ऑडीटर साहेब देऊ शकतील असे मला वाटते. कारण त्यांना रु. ५ लाखाऐवजी रु. ५ कोटींचे अधिकार पाहिजे. चीफ ऑडीटर यस-नो असे सांगतील. ते नो बोलले तर या ठिकाणी चर्चा करण्याची गरज नाही. जर ते यस बोलले तर आम्हांला ते मान्य आहे. धन्यवाद!

**नरेंद्र मेहता :-**

सर्वप्रथम महासभेला धन्यवाद की, कुठेतरी आमचा विचार केला पाहिजे. आम्ही पाच महिन्याचा वनवास भोगलेला आहे. प्रभाग समितीची निवडणूक झाली. आपल्या थोडे निदर्शनास आणून देतो. प्रभाग समितीच्या चेअरमनला बसायला खुर्ची असते ती खुर्ची दोन महिन्यांनी दिली गेली. त्या कार्यालयामध्ये खुर्चीपण नव्हती. मी ज्यावेळेला प्रथम चार्ज घ्यायला गेलो त्यावेळेला मला समजले की, मी शाळेत आलो की, कार्यालयात आलो. तशी परिस्थिती आहे. प्रथम त्या कार्यालयामध्ये अंगणवाडी आणि नंतर प्रभाग अधिकाऱ्यांचे कार्यालय आहे. नंतर बालवाडीनंतर मा. अध्यक्षांचे केबीन आहे. छोटी मुले शिकतात, तिथे आमचे टायपिस्ट, कॉम्प्युटर ऑपरेटर हे लोक बसतात. अजुनपर्यंत त्यांच्या बसण्याची व्यवस्था झालेली नाही. वारंवार तक्रार करुन ह्याचा निर्णय घेतला गेलेला नाही. आम्ही पत्र टाईप करण्यासाठी कॉम्प्युटरची रिक्वायरमेंन्ट केलेली होती. आम्हांला कमीत कमी सहा महिन्यापासून मा. उपायुक्त श्री. अजीज शेख साहेब बोलतात की, टेंन्डर कॉल करायचे आहे. आम्हांला रु. २० हजाराच्या कॉम्प्युटरसाठी एक पत्र टाईप करायला

लागते. तर अधिकाऱ्याचे विरुद्धाचे पत्र अधिकाऱ्याला टाईप करायला द्यायला लागले. अशी परिस्थिती आहे. म्हणून त्याचा विचार केला जावा. दुसरे ॲज पर माय नॉलेज प्रभाग समितीला गाडीसुद्धा उपलब्ध असते. मला अजुनपर्यंत गाडी उपलब्ध झालेली नाही. त्याबद्दल मला प्रथम गाडीचा खुलासा करावा. मॅडम मी शाळेत जातो की, कार्यालामध्ये जातो ते स्पष्ट करा.

**शशिकांत शहा :-**

मिटींग विषय के उपर चलनी चाहिए। विषय के बाहर नही चलनी चाहिए। पहले क्या विषय है वह देखिए।

**नरेंद्र मेहता :-**

प्रभाग समिती के वॉर्ड कमिटी की मिटींग लेने के लिए जगह नही है। तो मिटींग कहाँ लेने की।

**शशिकांत शहा :-**

वह प्रशासकीय बाब है।

**नरेंद्र मेहता :-**

लेकिन किधर कम्प्लेन्ट करने को जाने का?

**प्रफुल्ल पाटील :-**

मी महत्वाची बाब आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. प्रभाग समिती स्थापन झाल्यानंतर त्यांना त्यांचे अधिकार मिळायला पाहिजे. कायद्यामध्ये त्या तरतुदी आहेत. या ठिकाणी लेखाधिकाऱ्यांनी स्पष्टपणे उल्लेख करावा की, त्यांना त्यांचे काय अधिकार आहेत ते कळाले पाहिजे. फायनान्शिअल सॅन्क्शन किती लाखापर्यंत आले हेसुद्धा कळले पाहिजे. ते बोलतात की, सहा महिने गेले. आता उर्वरित कालावधीसाठी जर त्यांना काम करायचे असेल तर निधी तरी उपलब्ध करुन दिला आहे का? आज तुम्ही ठरवाल. निधी उपलब्ध करुन द्यायचे ठरवाल आणि नंतर तुम्ही बजेटमध्ये तरतुद १०२, १०३, १०४ खाली कराल. बजेटमध्ये तरतुद होईपर्यंत सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता, आपल्याला परत सहा महिने बघावे लागतील. ह्या गोष्टी सायमल्टेनिअसली करा. तुम्हाला अधिकार न देण्याबाबत सभागृहाचा अजिबात हेतू नाही. परंतु, आजचा विषयसुद्धा तुम्ही बघा. तुम्ही काय ठराव करता, विषय काय आहे. प्रभाग समितीचे कार्यक्षेत्र ठरविणे हा विषय आहे. प्रभाग समितीचे कार्यक्षेत्र ठरवायचे आहे का? प्रभाग समितीचे कार्यक्षेत्र ठरविण्याचा विषय असतो तेव्हा तुम्हांला त्या विषयावर फायनान्शिअल सँन्क्शन कुठले असावे याचा निर्णय घेता येत नाही. तुमचा विषय चुकीचा आहे. पहिल्यांदा कार्यक्षेत्र ठरवा आणि त्याच कार्यक्षेत्रामध्ये त्यांचे अधिकार हे सगळे ठरविले पाहिजे. परंतु, हा चुकीचा विषय असल्यामुळे तुमचा ठराव त्या विषयाला सुसंगत नाही. परंतु, त्याउलट प्रभाग समितीला लवकरात लवकर अधिकार दिले पाहिजेत या मताचा मी आहे. कारण ती शेवटी ऑटोनॉमस बॉडी आहे. त्यांना काहीतरी अधिकार द्या. पण विषय बदला.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी विधी सल्लागर बसून आपली फक्त गंमत बघत आहेत. डोंबाऱ्याचा खेळ चालू आहे. त्यांनी त्याच्याबद्दल त्यांचे थोडेसे निवेदन करावे. ऑडीटर आणि विधी सल्लागार दोघांना निवेदन करु द्या. जी चर्चा चाललेली आहे ती योग्य आहे की, चुकीची आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, वाहन आणि कार्यालयाबद्दल खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेब, आपल्या ज्या समस्या आहेत, आपण आपल्या त्या समस्या लवकरच सोडवू. आपल्याला आपले वाहन मिळेल.

**नरेंद्र मेहता :-**

ऑलरेडी सहा महिने गेलेले आहेत.

**मा. महापौर :-**

आपण संपुर्ण प्रयत्न करुन वाहन मिळवून देऊ. आपल्या कार्यालयाची व्यवस्था केली जाईल.

**नरेंद्र मेहता :-**

आता संध्याकाळी जाताना वाहन मिळेल का?

**मा. महापौर :-**

आपण स्टेप बाय स्टेप जाऊया. तुम्हांला आता रु. २ कोटीचे अधिकार दिलेले आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सभागृहात या महानगरपालिकेची बेइज्जती होत आहे. जर मा. सभापतींनी या ठिकाणी वाहन दिले नाही असे ते सभागृहात बोलत असतील तर आपण ही बाब सभागृहाला माहिती करुन द्यावी. आमची माहिती आहे की, प्रभाग समितीच्या सर्व मा. सभापतींना गाड्या दिलेल्या होत्या. त्यांनी काही गाड्या आवडल्या नाहीत म्हणून परत केलेल्या आहेत. जर गाड्या दिल्या नसतील तर ही सभागृहाची बेइज्जती जनतेला अशीच दाखविणार आहात का? ते गाडी मागणार तुम्ही गाडी देतो सांगणार हे

असे चालणार नाही. सभागृहामध्ये या महापालिकेची बेइज्जती झालेली आम्ही सन्मा. सदस्य खपवून घेणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मी सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले साहेबांना सागू इच्छितो की, आम्ही वाहनाबाबत पालिकेकडे बराच पत्रव्यवहार केलेला आहे. गेल्या वेळेला मिटींगमध्ये उठलो तेव्हा आपण मला बसवले आणि संगितले की, कार्यालयामध्ये चर्चा करु. तुमच्याकडे कार्यालयात चर्चा केली. परंतु, शेवटी काहीही निष्पन्न झाले नाही. मी सहा महिन्यापासून असाच पाठपुरावा करतो. परंतु, कार्यालयाकडून काहीही व्यवस्थित उत्तर मिळत नाही. (ठरावाचे वाचन केले.) वाहन खरेदी केली तर कुठे आहेत?

**मा. महापौर :-**

त्याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी स्पष्ट सांगतो की, तुम्ही जे सांगता ते सभागृहाला चुकीचे सांगता. तुम्हांला प्रत्येक वेळेला वाहन दिलेले आहे. तुम्ही प्रत्येक वेळेला वाहन नाकारलेले आहे. जेव्हा महानगरपालिकेकडे जेवढी वाहने उपलब्ध आहेत. तुम्हांला त्यो वाहनातून वाहन देण्याची व्यवस्था प्रत्येक वेळेला मा. उपायुक्त म्हणून संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली आहे. तुम्ही ते जाणुनबुजून टाळलेले आहे. तुम्ही सभागृहाची दिशाभूल करता.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हांला मेहेरबानीची वाहने नको आहेत. जी वाहने ठरावानुसार आहेत ती आम्हांला द्या.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

माझा त्या ठरावाशी काहीही संबंध नाही. मी तुम्हांला वाहन उपलब्ध करुन दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आमच्यासाठी गाडी मागितलेली होती ती कुठे गेली.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तुमच्यासाठी गाडी मागितली. त्या ज्या गाड्या मागितल्या त्या मा. महापौर, मा. उपमहापौर, स्थायी समिती मा. सभापती आणि मा. आयुक्तांना दिलेल्या आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही वारंवार विचारले गाड्या कुठे आहेत? मग पत्रामध्ये उत्तर का दिलेले नाही?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

उत्तर दिलेले आहे. तुम्हांला माहिती आहे, गाड्या कुठे गेलेल्या आहेत. गाड्या कोणाला दिलेल्या आहेत हे तुम्हांला माहिती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आमच्यासाठी गाड्या मागविलेल्या आहेत. ठराव आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तो महानगरपालिकेचा अंतिम अधिकार आहे. गाड्या त्या कारणासाठी मागितलेल्या आहेत. मा. महापौर, मा. उपमहापौर यांना गाडी दिलेली असेल तर काय गैर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग ठराव आमच्या नावाचा कशाला?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेब तथा प्रभाग समिती अध्यक्ष, आपल्या महानगरपालिकेमध्ये कुठल्याही पदाधिकाऱ्यांची निवड झाल्यानंतर त्यांना गाड्या देण्यांत येतात. आत्तापर्यंत दिलेल्या आहेत. आपण स्वतःच एवढे गर्भश्रीमंत आहात की, आपल्याला ॲम्बेसिटरमध्ये फार आवाज येत होता म्हणून आपण ती गाडी नाकारलेली होती. त्यानंतर आपण सांगितले की, ह्या एस्टिम गाड्या आलेल्या आहेत. या एस्टिममधील गाडी मला पाहिजे. त्यावेळेला मी स्वतः आपण माझ्याकडे चर्चा केली तेव्हा मी स्वतः सांगितलेले होते. मोठेपणाचा कुठलाही आव आणत नाही. परंतु, मी सांगितलेले होते की, मी माझी गाडी आत्ताच्या आत्ता तुम्हांला, तुमच्या ताब्यात देतो. मी मा. आयुक्त साहेबांशी बोलेन. आपण जेव्हा ही चर्चा करण्यासाठी तत्कालीन मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेबांच्या दालनात गेलो होते तेव्हा मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेबांनी माझ्यासमोर........

**याकुब कुरेशी :-**

मा. उपमहापौर साहबांना विनंती करतो की, जो विषय ह्या विषयपटलावर नाही, त्या विषयाचे विषयांतर करुन तुम्ही वेळ कशाला वाया घालवता?

**मा. उपमहापौर :-**

एक विषय संपवतो. त्यावेळेला मा. उपायुक्त साहेबांना मा. आयुक्त साहेबांनी सांगितलेले होते की, माझी गाडी त्यांना देऊन टाका. परंतु, त्यावेळेला सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता, आपण सांगितले की, मला

नवीन वाहन पाहिजे. मला ही गाडी नको. आजच्या सभेमध्ये हा विषय चर्चा व्हावा एवढी बाब नव्हती. आपल्याला अजुन ह्या सभागृहासमोर सांगतो की, माझ्याकडे उपलब्ध असलेली गाडी आपल्याला पाहिजे असेल तर ती आजही घेऊन जा. विषय संपवून टाका.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेबांना नवीन गाडी उपलब्ध करुन द्या असे कधी सांगितलेले नाही. मी हेच सांगीतलेले आहे की ठरावानुसार जी गाडी आमच्याकडे आलेली आहे. आम्हाला ती गाडी द्यावी. तुमचा ठराव आहे. तुम्ही त्याला अनुमोदन दिलेले आहे. तुम्ही सांबितले की माझी गाडी घेऊन जा मला ती गाडी मेहेरबानी करुन नको होती. माझ्याकडे ब-याच गाडया आहेत. आमच्यासाठी जी गाडी आणली ती व्यक्तिगत गाडी आम्हाला द्या. तुम्हाला द्यायची तर प्रशासनाला परत द्या. ते आम्हाला देतील.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी तुम्हाला परत खुलासा करतो. गेले सहा महिने मी खुलासा करतो. माझे एवढे दुर्दैव आहे की, सहा महिन्यापासुन खुलासा करतो की, ह्या ज्या गाडया बोलवलेल्या होत्या ह्या गाड्या त्यावेळेस महानगरपालिकेने असा निर्णय घेतला. मा. महापौरांना, मा. उपमहापौरांना, स्थायी समितींच्या चेअरमनला आणि मा. आयुक्त साहेबांना एक गाडी देण्यात यावी. तुम्हाला हा निर्णय मान्य नसेल तर ह्याच्यामध्ये काय गैर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना गाडी दिली तर ठिक आहे. परंतु आमचे काय? त्यांना गाडी दिली म्हणून आम्हाला गाडी द्यायची नाही का? मी ती ॲम्बेसिटर सोडून गेल्या नंतर तुम्ही काय केली होती? मला मनापासून सांगा की, गाडी वापरण्या लायक होती का? सहा महिन्यापासून चाललेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मोखाडा आणि जवाहर सारख्या नगरपरिषदेमध्ये सहा-सहा नगरसेवक एक-एक गाडी मध्ये जातात. पंधरा वर्षापूर्वीची नगरपरिषद होती. काय परिस्थिती होती हे सन्मा. सदस्य नरेन्द्र मेहता विसरलेले आहेत. सन्मा. सदस्य नरेन्द्र मेहता, तुम्ही मोठे मन ठेवा. तुमची स्वतःची गाडी वापरा महापालिकेची गाडी जाऊ दे. तुमची स्वतःची गाडी चांगल्या कामासाठी वापरा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्याच्यामध्ये थोडासा खुलासा करतो की महानगरपालिकेने हा निर्णय घेतलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सर्व सभागृहाला सांगू इच्छितो की, आमचे सहकारी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील होते. हे तर हे प्रभाग समितीचे मा. सभापती आहेत. परंतु, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील नगराध्यक्ष होते त्यावेळेलासुद्धा एक गाडी होती. परंतु, त्यांनी नगरपालिकेची गाडी कधीही वापरलेली नाही. स्वतःच्या आयकॉन गाडीला त्यांना नगराध्यक्षाचा बोर्ड असायचा. ते त्या गाडीचे फ्युल सुद्धा स्वतः टाकायचे. थोडी उदारता दाखवली पाहिजे. तुमच्या पाच गाड्यांना बोर्ड लावा आणि वापरा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलल्याप्रमाणे पुर्वी नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा असतांनासुद्धा ते एक दिवससुद्धा गाडीत बसलेले नव्हते.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम तसे झाले असते तर बरोबर आहे. परंतु, माझी गाडी दुसरे वापरतात. मग मी असाच फिरु का? या ठरावानुसार मला गाडी उपलब्ध होईल की नाही ते सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला उत्तर दिलेले आहे. आपल्याला गाडीची व्यवस्था प्रशासन करुन देईल. हीच गाडी मिळावी असा आपला हट्ट आहे का?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आम्हांला महिला व बालकल्याण समितीच्या मा. सभापती बोलल्या की, मला गाडी नसेल तरी चालेल आणि ह्यांना घरच्या गाड्या असून गाडी-गाडी बोलून सभागृहाचा वेळ घेतात.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, त्यांना पैशाची गरज असेल. परंतु, मला पैशांची गरज नाही. मला महापालिकेचा पैसा नको आहे. मला कामकाज करण्यासाठी गाडी द्यावी.

**रोहित सुवर्णा :-**

ॲन्टी करप्शनने काय केले ते सगळ्यांना माहिती आहे. ॲन्टी करप्शनमध्ये काय झाले ते सगळ्यांना माहित आहे.

**जयंत पाटील :-**

किती वेळ गाडीच्या विषयावर चर्चा चालणार आहे. गाड्या कशासाठी पाहिजे. मला आठवते पहिल्या वेळेला सन १९९१ साली श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा साहेब नगराध्यक्ष असतांना आम्ही त्यांच्यासाठी त्यांना गाडी द्या असा ठराव केला. सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलले तरीसुद्धा त्यांना शेवटपर्यंत मिळालेली नाही. ती गाडी कलेक्टर साहेबांकडे जाउुन बसली. ते नगराध्यक्ष असतांना त्यांनी स्वतःच्या गाडीने प्रवास केला. आपल्याकडे गाड्या असल्या म्हणून आपले कार्य मोठे विस्तृत होणार नाही. तुमचे कार्य गाडी नसतांना करुन दाखवा. गाडी असतांना तुम्ही काय काय करतात हे जगाला माहिती आहे. ते सगळ्यांनी पाहिले आहे आणि पेपरमध्ये आलेले आहे. कशासाठी गाडी पाहिजे. जनतेच्या पैशाचा अशा तऱ्हेने दुरुपयोग होत असेल तर हे अतिशय चुकीचे आहे. गाड्या असल्या म्हणून आमचे कार्य मोठे होते अशातला काही भाग नाही. गाड्या देण्याचा संपुर्ण अधिकार मा. आयुक्त साहेबांचा आहे. कुठली गाडी कोणाला द्यायची हा त्यांचा नियम आहे. कुणीतरी मर्सिडीज मागणार असेल तर मा. आयुक्त साहेब देणार नाहीत. मग ती गाडी घरघर आवाज करत असेल ती घ्यावी लागेल. हे काय चाललेले आहे. गाडीच्या विषयावर इतका वेळ चर्चा चालू आहे. विषय कुठला चाललेला आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा, आपण आज सभेपुढे प्रभाग समितीचे अधिकार प्रदान करणे संदर्भात जो विषय विषयपटलावर आणला. मी त्याबद्दल सर्वप्रथम अभिनंदन करतो आणि आभार व्यक्त करतो. या सभागृहाचे जेष्ठ सदस्य माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांनी प्रभाग समितींना अधिकार प्रदान करायला पाहिजे. त्यांनी या ठिकाणी जी भावना व्यक्त केली, खरोखर प्रभाग समितीला अधिकार मिळायला पाहिजे असे त्यांना वाटते. आमचे सन्मा. सदस्य आमच्या प्रभाग समितीचे सहकारी त्यांना गाड्याविना जमत नाही. आता काय करणार. तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. गाडी नसतानादेखील काम करायला पाहिजे. कारण आपल्याला या ठिकाणी मा. सभापती म्हणून निवडून दिल्यानंतर आपण लोकांसाठी कार्य केले पाहिजे. मी गाड्यांसाठी कधीही घोळ घातलेला नाही हे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांना माहिती आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपको गाडी मिल गई है इसके लिए आप नही कह रहे है। आप बढा मन रखकर सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी को गाडी दिजीए।

**आसिफ शेख :-**

मैने प्रशासनको गाडी वापर कर दि है। आज एक महिना हो गया है। मैने गाडी दे दिया है। वापस माँगी नही। आपण या ठिकाणी खरंच आत्मीयतेने विषय आणलेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य आसिफ शेख खोटे बोलतात. ते बोलतात की, एक महिन्यापुर्वी गाडी दिली. परंतु, मी परवा त्यांच्या गाडीने स्टेशनपर्यंत जाऊन आलो. ते खोटे बोलतात.

**नयना म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख तुम्ही २६ तारखेपर्यंत गाडी घेऊन फिरत होते.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, परवा माझ्याबरोबर सरकारी गाडीमध्ये बसले असले तर मी राजीनामा देतो किंवा त्यांनी द्यावा. मी गाडी ताब्यात देऊन पंधरा-वीस दिवस झालेले आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

परवा म्हणजे परवाचे मी बोलत नाही.

**आसिफ शेख :-**

तुम्ही या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल करु नका. या ठिकाणी गाड्यांचा विषय नाही. प्रभाग समितीला अधिकार प्रदान करणेबाबतचा विषय चाललेला आहे. आपण या ठिकाणी कार्यक्षेत्र यापुर्वीच निश्चित केले अहे. कार्यक्षेत्र निश्चित झाल्यामुळे आपण या ठिकाणी प्रभाग समितीची स्थापना केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अन्वये आपण चार प्रभाग समितीची स्थापना दि. १९/१२/२००३ अन्वये केलेली आहे. मा. सभापतींची निवड दि. ०४/०५/२००५ रोजी झालेली आहे. मा. सभापतींची निवड झाल्यानंतर जेव्हा आम्ही त्या ठिकाणी पदभार स्विकारला तेव्हा आमच्या निदर्शनास आले की, आम्हांला या ठिकाणी नुसते मा. सभापती बनविले तरी विशेष अधिकार कलम २९ अन्वये आम्हांला प्राप्त व्हायला पाहिजेत. कलम २९ अन्वये कोणकोणते अधिकार प्राप्त व्हायला पाहिजे त्याची व्याख्या संपूर्ण अधिनियमात केलेली आहे. आपण त्याला अनुसरुन या ठिकाणी जो विषय आणला त्याबद्दल आमचे सन्मा. नेते श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा, तत्कालीन मा. आयुक्त साहेब श्री. आर. डी. शिंदे साहेब आणि मा. महापौर साहेब मी या ठिकाणी आपले मनःपुर्वक आभार व्यक्त करतो. आपण उशिरा का होईना लेकिन आपने दुरुस्त कम किया है। इसलिए मै आपका यहाँपर अभिनंदन करता हूँ। या ठिकाणी आपले स्वागत करतो. आपल्याला धन्यवाद देतो. प्रभाग समितींना अधिकार प्रदान करण्या संदर्भातील गोष्टी बाकी राहिलेल्या आहेत. प्रभाग

समितीला त्या समितीच्या अखत्यारित सगळे अधिकार मिळायला पाहिजे अशी प्रामाणिक भावना आमची आहे आणि आमच्या सभागृहाची आहे. कारण त्या प्रभाग समितीला अधिकार जर मिळाले तर त्या तिकडच्या प्रभाग समितीचे सदस्य आहेत, जे नगरसेवक सदस्य आहेत त्यांना ते अधिकार ऑटोमॅटिक प्राप्त होतात. स्वर्गीय राजीव गांधी यांनी ते ७४ घटना दुरुस्ती नुसार स्वप्न पाहिले की, प्रभाग समितीचे काम सक्षमपणे, प्रभावीपणे चालण्यसाठी सत्तेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. अधिकारांचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. आपल्याकडे दुर्दैवाने म्हणा, सत्तेचे किंवा अधिकाराचे विकेंद्रीकरण झालेली नाही. परंतु, उशिरा का होईना आपण या ठिकाणी विषय आणलेला आहे. मी त्याबद्दल पुन्हा-पुन्हा सांगतो की, मी या ठिकाणी आभार मानावे तेवढे कमी आहेत. आता पैशाचा विषय बाकी राहिला. आपली जी आर्थिक बाजू आहे, आम्ही आपल्याकडे संपूर्ण निवेदन दिले की, प्रभाग समितींना अधिकार द्या. प्रभाग समिती स्थापन करण्यापुर्वी बजेटची तरतुद करायला पाहिजे होती. परंतु, दुर्दैवाने ती केलेली नाही. आता उशिरा का होईना आपण त्याच्यामध्ये रिॲप्रोप्रिएशन करु शकतो. महासभेला तो अधिकार आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ अन्वये मा. महासभेला ते अधिकार आहेत की, आपण बजेटचे रिॲप्रोप्रिएशन करु शकतो. आपल्याला जकात करापोटी जे रु. २० कोटी अतिरिक्त पैसे येणार आहेत, जी अखर्चिक रक्कम अंदाजपत्रकातील अर्थसंकल्पात आहे. आपल्याला त्याच्यामधून रु. २४ कोटी उपलब्ध होणार आहेत. त्यापैकी प्रभाग समितीस रु. २-२ कोटी द्यावे. असा ठराव या ठिकाणी सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी मांडलेला आहे. या ठिकाणी त्यांनी असे नमुद केलेले आहे की, रु. २-२ कोटी सगळ्यांच चार प्रभाग समितींना द्या. त्याचप्रमाणे कलम २९ अन्वये प्रभागा अंतर्गत करावयाच्या सर्व कामांना तसेच साहित्य, वस्तु खरेदी करणे कामी रु. ५ लाखापर्यंत कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी आणि प्रभागातील नवीन कर आकारणी करण्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे असा ठराव त्यांनी मांडलेला आहे. याचा अर्थ असा होतो की, आम्हांला निविदा मंजुर करण्याचा अधिकार नाही. ते अधिकार स्थायी समितीचे असतात. आम्हांला प्रशासकिय आणि आर्थिक मंजुरीचे अधिकार आहेत. जी-जी विकास कामे आमच्या प्रभागाच्या अखत्यारीत आहेत, मग ती पाणी पुरवठ्याची असो, बांधकामाची असो, साफसफाईची असो, कोणत्याही विषया संदर्भातील असो, त्या विषयाला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी रु. ५ लाखापर्यंत द्यायचा अधिकार कायद्यान्वये आम्हांला प्राप्त आहे. आपण या ठिकाणी त्याचा ठराव केलेला आहे. आपण याच्यामध्ये विशेष असे काहीही केलेले नाही. खरे म्हणजे आपल्याला हे अगोदर करायला पाहिजे होते. झाले गेले गंगेला मिळाले. परंतु, आपण इथून पुढे प्रभाग समितीमार्फत आपल्याकडे जे नागरिक आहेत जे नगरसेवक आहेत त्यांची कामे प्रभाग स्तरावर झाली पाहिजेत. प्रभावीपणे आणि सक्षमपणे झाली पाहिजेत. मुख्य कार्यालयामध्ये नागरिकांना येण्याची आवश्यकता भासायला नको. मुख्य कार्यालयात केव्हा यायला पाहिजे, जेव्हा प्रभाग स्तरावर काम झाले नाही तर त्यांनी मुख्य कार्यालयामध्ये येऊन त्यांची कामे करुन घ्यायला पाहिजे. जर तुम्ही प्रभाग स्तराला अधिकार दिला नाही. प्रभाग समितीमार्फत प्रभावीपणे, सक्षमपणे कामे होत नसतील तर आमचा तिकडे राहण्याचा अधिकार नाही. नगरसेवकांनी त्या समितीवर घेण्याचा अधिकार नाही. नगरसेवकांनी त्या समितीवर घेण्याचा अधिकार होत नाही. आपल्याला अधिकार देण्या संदर्भात या ठिकाणी विषय आणलेला आहे. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी सुस्पष्ट ठराव मांडलेला आहे. आणि सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांनी अनुमोदन दिलेले आहे. गाड्यांबाबतचा वादाचा प्रश्न राहिला. गाड्यांचा विषय संपलेला आहे. कारण त्याला गाड्याविना जमत नसेल तर त्यांना तसे करावे. आपल्याला गाड्याविना जमते. आपण सभागृहाचे काम करित आहोत. तशीच सभागृहाची भावना आहे. ठराव झालेला आहे. मा. महापौर साहेब, आपण त्या संदर्भात रुलिंग देऊन पुढची कार्यवाही करावी.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, ७४ घटनेमध्ये गाडी देण्याची प्रोव्हिजन नाही. आपण चिफ ऑडीटर साहेबांना विचारावे म्हणजे प्रश्न मिटला. त्यांचे निवदन ऐका. ते काय बोलतात ते ते घ्या.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी प्रशासनाला विनंती करतो की, आपले अधिकारी गाड्या वापरतात. तशा नवीन गाड्या आपल्या प्रभाग समिती अधिकाऱ्याला आणि प्रभाग समिती सभापतीला आठ दिवसात उपलब्ध करुन द्या, ही नम्र विनंती करतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, त्याच्यामध्ये एक खुलासा करावासा वाटतो की, आपल्याला जी रोख रक्कमेची प्रतिपुर्ती करा अशी मागणी केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मी गेल्या सहा महिन्यांची मागितलेली आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी हे पत्र सभागृहासमोर वाचून दाखवितो.

**आसिफ शेख :-**

सहा महिने झालेले नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

पत्र वाचून दाखवा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

पत्रात म्हटलेले आहे की, वाहनाची प्रतिपुर्ती मिळणेबाबत आहे. (पत्राचे वाचन केले.)

**नरेंद्र मेहता :-**

माझे पत्र आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हे आपलेच पत्र आहे. कारण आपण दोनच पत्र दिलेली आहेत. आपली दोन्ही पत्रे वाहनाबद्दल आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

त्याच्यावर माझी सही आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण ६ तारखेला एक पत्र दिलेले आहे. त्याचा नं. ५७ आहे. ११ तारखेचे एक पत्र दिलेले आहे ह्या पत्रावर सही आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ही माझी सही नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग कार्यालय मराठी शाळा, बंदरवाडी, भाईंदर (पूर्व), तालुका जिल्हा ठाणे ४/११/२००५ दुरध्वनी २८१७ ८५२२. जा.क्र. मनपा/प्र.स.अ./५७/५/०५-०६, दिनांक ०६/०८/२००५ स्वीय सहाय्यक मा. सभापती प्रभाग समिती क्र. ०३.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर, पुढचा विषय घ्या. इतर अन्य विषय प्रलंबित आहेत.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आमच्या विषयाला रुलिंग द्या.

**नितीन ठाकूर :-**

हे काय चाललेले आहे. सन्मा. सदस्य गाडी मागतात, पैसे मागतात. मा. सभापती गाडी मागतात की, पैसे मागतात. त्यांना गाडी पाहिजे, पैसे पाहिजे की दोन्ही पाहिजे?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला सभागृहातील लोक बघून हसतात. काय चाललेले आहे? पब्लिकच्या पैशाचा दुरुपयोग आहे. ही पैसे मागण्याची पद्धत आहे का? त्यांना रु. १३,५००/- पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, मी तुमच्याकडे ठराव लिहून पाठविलेला आहे. त्याच्यावर सही आहे, ही बघा.

**मा. महापौर :-**

आपल्याकडे उपलब्ध गाड्यांपैकी आजच्या आज गाडी देण्यांत येईल. आपण बसून घ्या. इथे हा विषय नाही. ह्या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. हा विषय सर्वानुमते मंजुर आहे. पुढील विषय घेण्यांत यावा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, ऑडीटर साहेबांचे रु. ५ कोटीवर काय म्हणणे आहे. त्यांचे मत घ्या. त्यांचे मत आवश्यक आहे. त्या विषयावर ठराव आहे.

**आसिफ पटेल :-**

हा मा. महापौरांचा अधिकार आहे. हे मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

महासभेने ठरविलेले आहे. सर्वानुमते ठराव मंजुर झालेला आहे. आपण बसून घ्या. आपल्याला दालनामध्ये माहिती देण्यांत येईल. सभागृहाने तसे ठरविलेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर, आपण रु. ५ कोटीवर चीफ ऑडीटर साहेबांना विचारा.

**मा. महापौर :-**

सभागृहाने ठरविलेले आहे. आपण बसून घ्या. आपल्याला बोलायला परमिशन दिलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयावर ऑडीटर साहेबांचे मत पाहिजे. ते द्यायला काय झाले? चीफ ऑडीटर साहेब सभागृहात हजर आहेत. त्यांनी त्यांचे मत दिले पाहिजे. मग तुम्ही ठरावावर निर्णय द्यायचा आहे. आम्ही ७४ घटना दुरुस्तीनुसार बोलतो.

**रोहित सुवर्णा :-**

हे चुकीचे चाललेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे मत कुठे दिलेले आहे. ही त्यांची टिपणी नाही.

**रोहित सुवर्णा :-**

देशाच्या संविधानापेक्षा मोठे कोणी नाही. देशाच्या संविधानाने हा अधिकार दिलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हीसुद्धा ट्रेनिंगला जातो. आम्हांला सर्व माहिती आहे. आम्हांला सगळे व्यवस्थित कळते.

**आसिफ पटेल :-**

देशाच्या संविधानाचा अधिकार.........

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांला नाही.

**आसिफ पटेल :-**

माझ्या मते तरतुदी, पुर्तता करुनच करा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ऑडीटरला सांगितले की, तुम्ही बदलता तर तिकडे ओपिनियन घ्या. तुम्हांला हा अधिकार नाही.

**मा. महापौर :-**

सचिव पुढील विषय घेण्यांत यावा.

**मिलन म्हात्रे :-**

७४व्या अमेन्डमेंन्टमध्ये क्लिअरकट लिहिलेले आहे की, रु. ५ लाखाची तरतुद आहे. ऑडीटरने ती तरतुद आहे का ते सांगावे.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही खाली बसणार नाही. कारण तुम्हांला जे दिलेले आहे ते चुकीचे आहे असे मला वाटते. मा. महापौर मॅडम, आपण ७४ अमेंन्डमेंन्टचे उल्लंघन करु नका.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, आपण याच्यावर रुलिंग द्या.

**मिलन म्हात्रे :-**

रुलिंग देऊन प्रथम त्यांचे ओपिनियन घ्या.

**लिओ कोलासो :-**

सचिव साहेब, मा. महापौरांनी ह्या विषयावर रुलिंग दिलेले आहे. परंतु, दुसरा विषय घ्यावा अशी मी मा. महापौरांना केलेली विनंती आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी ऑडीटर साहेब हजर असतांना आपण त्यांच्याशी सल्लामशोहरा करीत नाही याचे मला फार आश्चर्य वाटते.

**मा. महापौर :-**

सल्ला घेऊनच हा विषय विषयपटलावर घेतलेला आहे. तरतुदीनुसार त्यांनी मंजुरी दिलेली आहे. आपण बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तरीसुद्धा त्यांना ओपिनियन देऊ दे. ह्याच्यावर काहीच निर्णय नाही.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही या ठिकाणी ऑडीटर साहेबांचे मत ऐकलेले नाही. त्यांनी त्यांचे मत सांगावे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी त्यांचे मत मांडावे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, देशाच्या संविधानाचे उल्लंघन करु नका अशी आम्ही आपल्याला रिक्वेस्ट करतो. या सभागृहामध्ये काही वर्षापुर्वी मिसकॉन्टॅक्टदेखील झालेला आहे. परत असे होण्याची शक्यता या ठिकाणी आम्हांला दिसत आहे. आम्ही आपल्याला रिक्वेस्ट करतो की, आपण घेतलेल्या निर्णयावर पुन्हा एकदा विचार करावा. आपण रिव्ह्यु करा अशी माझी विनंती आहे. हे अधिकार आपल्याला नाहीत. आपण वॉर्ड कमिटीला आपले अधिकार देऊ शकत नाही. हा महासभेचा अधिकार आहे.

**प्रकरण क्र. २९ :-**

प्रभाग समित्यांच्या कामकाजांचे कार्यक्षेत्र ठरविणेबाबत.

**ठराव क्र. ३१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या चारही प्रभाग समित्यांची स्थापना ठराव क्र. ५८, दि. १९/१२/२००३ ने झाली असून प्रभाग सभापतींची निवड दि. ०४/०५/२००५ रोजी झाली आहे. या दरम्यान प्रभाग समितीस सक्षमपणे व प्रभावीपणे कार्य करणेसाठी अद्यापही अधिकार प्राप्त झालेले नाहीत. तसेच महानगरपालिका अर्थसंकल्पात प्रभाग समितीस अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नसल्याने विकास कामे करता येत नाहीत.

माजी पंतप्रधान भारतरत्न श्री. राजीवजी गांधी यांनी ७४व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार बहाल करुन स्थानिक स्तरावर नागरिकांच्या अडीअडचणी त्वरीत सोडविणे करिता अधिकारांचे विकेंद्रीकरण केले आहे. प्रभाग समित्यांना वैधानिक दर्जा प्राप्त असुन वैधानिक तरतुदीप्रमाणे व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ नुसार प्रभाग समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रांतील रुपये पाच लाख खर्चापर्यंतचे कामकाज अंदाजपत्रकीय तरतुदींच्या अधिन राहून प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेचे अधिकार आहेत.

अंदाजपत्रकातील अखर्चित रक्कम व जकात करापोटी अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा जादा वसुल होणारी रु. २० कोटीची रक्कम असे एकूण रुपये २४ कोटी प्रभाग समितीस अनुदान वाटप करणेस उपलबध होऊ शकतील. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ अन्वये अशा अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणे व अतिरिक्त अनुदान मंजुर करणेचे व प्रभाग समित्यांना उक्त अधिनियमांतील कलम २९(८) अन्वये अधिकार प्रदान करणेचे मा. महासभेस अधिकार आहेत.

मुख्य कार्यालयावरील दिवसेंदिवस वाढत जाणारा कामांचा ताण कमी व्हावा व नागरिकांची दैनंदिन विकास कामे प्रभाग स्तरावर सक्षम व प्रभाविपणे होऊन नागरिकांची होणारी गैरसोय दूर व्हावी तसेच विकेंद्रीकरण करण्याचा हेतु खऱ्या अर्थाने फलद्रुप व सार्थक करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ अन्वये अंदाजपत्रकातील अखर्चित रक्कम व जकात करापोटी अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा जादा वसुल होणारी रु. २० कोटीची रक्कम असे एकुण रुपये २४ कोटी पैकी प्रभाग समिती क्र. १, २, ३ व ४ या चारही प्रभाग समितीस प्रत्येकी रुपये दोन कोटी प्रदान करणेस व कलम २९ व ७३ अन्वये प्रभाग अंतर्गत करावयाच्या सर्व कामांना तसेच साहित्य वस्तु खरेदी करणेकामी वरील चारही प्रभाग समितींना पाच लाखापर्यंतच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरीस व प्रभागातील नवीन कर आकारणी करणेंस व पुढील कार्यवाही करणेंस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३० चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, या विषयाचा ठराव वाचण्यापुर्वी मी जो प्रश्न विचारलेला होता. त्याचे निवेदन करायला सांगितले होते. ते विधी सल्लागारांनी करावे.

**एस्. ए. खान :-**

(ठरावाचे वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठरावको मेरा अनुमोदन है।

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अभी विषय चालू नही हुआ और ठराव चालू हो गया। यह क्या हो रहा है। कौनसे विषय का यह लोग ठराव मांड रहे है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण जेव्हा बोलता तेव्हा इतरांना बोलायची संधी दिली जात नाही. मग दुसरे बोलत असतांना आपण मध्ये का बोलता? आपल्याला बोलण्याची संधी दिली जाईल. आपण बसून घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठराव काय आहे? तीन वर्षासाठी मुदतवाढ दिलेली आहे की, एक वर्षासाठी मुदतवाढ दिलेली आहे.

**शुभांगी नाईक :-**

ही मुदतवाढ किती वर्षासाठी देणार? ही मुदतवाढ तीन वर्षासाठी की एक वर्षासाठी देणार?

**एस्. ए. खान :-**

ही मुदतवाढ तीन वर्षांसाठी देण्यांत येणार आहे. प्रत्येक वर्षी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी घेण्यांत येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिव साहेब ठराव निट वाचून दाखवा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३० च्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

३१ तारीखको कॉन्ट्रॅक्ट खत्म होनेवाला है, यह आफीसरको मालून नही है क्या? उसको लेट आने का क्या कारण है? फिर घाईघाईमे करने का और गणपती या नवरात्र आ रहा है। इसके लिए जल्दी करने का यह गलत बात है। आप पहले क्यो नही लाते? तुमको मालूम है की, ३१ तारीख को ठेका पुरा हो रहा है। तो उसको दो महिना पहले लाना चाहिए।

**मा. महापौर :-**

ते वेळेमध्येच आहे. दि. ३१ ऑगस्टला मुदत संपणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मॅडम, आता वाचन केले की, ३१ तारखेपर्यंत ठेका देणार नाही आणि परत मुदतवाढ देणार आहे. कारण आपल्याला वेळ कमी आहे. तुम्ही आत्ताच तिकडे वाचन केले.

**मा. उपमहापौर :-**

त्याच्यामध्ये काय म्हटलेले आहे की, निविदा जास्त दराच्या आल्या किंवा काही कारणास्तव त्याच्यामध्ये दिरंगाई झाली तर सणावाराचे दिवस आहेत. शहरामध्ये अडचण होऊ नये म्हणून आहेत त्यांना आपण मुदतवाढ देऊ. जर निविदेमध्ये कुठे गडबड झाली. आपल्या निविदा वेळेवर आल्या नाहीत किंवा त्या जास्त दराच्या आल्या तर असे होते.

**धनराज अग्रवाल :-**

आपण निविदा वेळेवर का काढली नाही हेच मला विचारायचे आहे. आपण निविदा वेळेवर काढली पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

आपण निविदा वेळेवर काढली. परंतु, आपली सभा दोन वेळा तहकूब झालेली होती. आपण एकदा पुरग्रस्तांसाठी सभा तहकुब केलेली होती.

**धनराज अग्रवाल :-**

परंतु, त्या सभेमध्ये हा विषय नव्हता. आजच हा विषय आलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

हा अजेंड्यावरचा विषय आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हा विषय आत्ताच आलेला आहे. मागच्या वेळेला हा विषय आलेला नव्हता.

**शुभांगी नाईक :-**

हा विषय मागच्या वेळेला आलेला होता. आपली मिटींग दोन वेळा रद्द झाली त्यावेळेला हा विषय आलेला होता.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. सचिव पुढील विषय घेण्यांत यावा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, आता पाच वर्षापासून जी मुले नालेसफाईवर कामाला आहेत. ती मुले पाच वर्षापर्यंत नालेसफाईवर राहावी का? कुठल्या तरी वशिल्यावर लागतात. त्यांना कामाचा कसलाही अनुभव नाही. ते त्यांची मुकादमगिरी बजावतात. ते कुठपर्यंत योग्य आहे. ठेकेवाल्यांनी त्याच्यावर लक्ष द्यावे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण हा ठेका एक वर्षासाठी द्यायचे निश्चित केलेले आहे. परंतु, मला असे विचारायचे आहे की, हा संपूर्ण एक वर्षभराच्या ह्या ठेक्याचे किंवा कचऱ्याचे नियोजन किंवा जो कार्यभार किंवा पदभार कोण सांभाळणार आहे. त्याचे इन्चार्ज अधिकारी कोण आहेत? याची मला माहिती पाहिजे. कृपया ती माहिती मिळावी.

**मा. महापौर :-**

सध्या त्या पदावर डॉ. बावस्कर साहेब कार्यरत आहेत.

**प्रभात पाटील :-**

मी आपल्याला ठराव वाचून दाखविते. डॉ. बावस्कर साहेबांना सहा महिन्याची जी मुदत दिलेली आहे या ठिकाणी प्रकरण क्र. २२, ठराव क्र. २५ आहे, त्याच्यामध्ये त्यांना घनकचरा व्यवस्थापन, प्राथमिक आरोग्य केंद्र हस्तांतर, महापालिकेच्या आरोग्य केंद्रावर देखरेख, बाल आरोग्य कार्यक्रम, प्रसुती आणि बाल रुग्णालये आणि कर्मचारी आणि अधिकारी यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव याची कामे विहित केलेली आहेत आणि दैनंदिन साफसफाई, औषध फवारणी, नालेसफाई, खोदाई यासाठी त्यांनी श्री. कांबळे आणि श्री. संदिप शिंदे यांना कार्यभार दिलेला आहे. ह्याच्यामध्ये डॉक्टर साहेबांना काम करता येणार नाही. श्री. संदिप शिंदे आणि श्री. कांबळे यांना आपण हा कार्यभार सोपवणार का? ह्या संपुर्ण शहराची ही जबाबदारी आहे. आरोग्याची जबाबदारी आहे. मा. महापौर मॅडम, आपल्याला माझी विनंती आहे की, आपल्याकडे मा. आयुक्त, सहाय्यक आयुक्त, उपायुक्त बरेच आहेत. हे जे काम आहे ते कोणत्याही उपायुक्ताकडे सोपविण्याऐवजी मुख्यालयाकडे सोपविण्यांत यावे असे मला वाटते आणि तशी मी तुम्हांला या ठिकाणी विनंती करते. त्यांची मर्यादाच त्यांनी या ठिकाणी मर्यादित केलेली आहे. उपरोक्त कामासाठी मा. उपायुक्त (मुख्यालय) यांच्याकडे ते काम देण्यांत यावे असा मी ठराव मांडते.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने बोलतोय. एवढा हादसा झाला. त्याच्यामध्ये आरोग्याचे काम खुप वाढले. आता डॉक्टर साहेब तब्येतीच्या मानाने त्यांच्याकडे एवढा मोठा कारभार सोपवलेला आहे. आणखी परत आरोग्याचे काम बघायचे. तर ते त्यांच्या आवाक्याच्या बाहेर आहे. सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी जी सुचना मांडली की, मा. उपायुक्त यांना हे काम द्यावे तर माझे असे म्हणणे आहे की, मा. उपायुक्तांना हा कारभार सोपवावा. कारण ते त्याच्यामध्ये सक्षम असतील आता ते कारभार सांभाळतील अशी आम्हीसुद्धा तुम्हांला सुचना करतो. आमच्या सुचनेचा आदर करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील आणि सन्मा. सदस्य प्रभात पाटील यांनी जी सुचना मांडलेली आहे. ह्या सुचनेबाबत मा. आयुक्त साहेबांशी चर्चा करुन कार्यवाही केली जाईल. ते मा. आयुक्त साहेबांचे अधिकार आहेत. त्यामुळे त्याच्याशीच चर्चा करावी लागेल.

**रतन पाटील :-**

हे मा. आयुक्त साहेबांचे अधिकार आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी एक सुचना करु इच्छितो. मा. महापौर मॅडम मी आपल्या वॉर्डसंबंधी बोलू इच्छितो की, वॉर्ड क्र. १० जो आहे, ॲक्शन प्लॅन फॉर एम्प्लीमेंन्टेशन ऑफ सॉलिड वेस्ट मॅनेजमेन्ट जे आम्हांला गेल्या वर्षी दिले गेले. मी आपल्यासमोर त्याची काही माहिती ठेवू इच्छितो. मा. महापौर मॅडम, ती आपल्याच वॉर्डची आहे. ह्याच्यामध्ये मायक्रोप्लॅनिंग केले गेले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, ही माहिती ह्या विषयाला धरुन असेल तर आपण बोला नाही तर माझ्या वॉर्डशी संबंधित असेल तर माझ्या दालनात बसून आपण सविस्तर चर्चा करुया. तुम्ही त्यासाठी या ठिकाणी वेळ वाया घालवू नका. आपण प्रत्येक विषयावर १५-१५ मिनिटे बोलतात. तुम्ही वेळेचे भान ठेवून बोला.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी लाखो रुपयांची तफावत आहे हे मी तुम्हांला दाखवून देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, हे जे कोष्टक आरोग्य विभागाने दिलेले आहे. तुम्हांला हा जो चार्ट दिलेला आहे हा पुर्णपणे चुकीचा आहे. त्याला ऑडीट डिपार्टमेंन्टची कुठलीही परमिशन नाही असा माझा स्पष्टपणे आरोप आहे. तुम्ही घाईघाईने ठराव मंजुर केलेले आहेत. परंतु, ऑडीट डिपार्टमेंन्टने तुम्हांला परमिशन दिलेली नाही. त्यांची परमिशन घेतलेली नाही. आता माझ्याकडे आमचा ठराव आहे. आम्हांला हा ठराव मांडायचा आहे. भले तुम्ही तो ठराव फेटाळा मी माझा ठराव तुम्हांला देतो. तुम्हांला घाई आहे का? मिटींग संपायला अजून चार तास बाकी आहेत. आम्ही आमचा ठराव ह्याच्यावर आणलेले आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे तुम्ही खाली बसा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझी सुचना आहे की, गेल्या वेळेला डॉक्टर साहेबांनी वॉर्डवाईज मायक्रोप्लॅनिंग सुरु केले होते. त्याच्यामध्ये सेक्शन घोडबंदर हा टोटल ॲन्युअल कॉस्ट दाखविलेला होता. रु. ५,३१,०७५/- पर ॲनम विथ ड्रायव्हर होते. ड्रायव्हरच्या पगारासहित व नंतर ऑफ जनरेटर आणि कम्युनिटी बिल रु.

३,५६४/- दाखविलेले होते. ह्याच्यामध्ये ह्या वर्षाचे बिल दाखविले. त्याच्यामध्ये खुप फरक आहे. जी कचऱ्याची क्वान्टिटी दाखविली गेली ती १८४८ किलो आहे आणि घोडबंदरचे पॉप्युलेशन ९३४३ आहे आणि झोपडपट्टीचे ८६६४ आहे आणि फ्लोटिंग पॉप्युलेशन ५०० आहे आणि तुम्ही आज आमच्या काय ठेवलेले आहे ते बघा. ह्याच्यामध्ये बायोडिग्रेबल वेस्टेज ती ११५६ किलोग्रॅम रिसायक्लेबल, २७७ आहे डेब्रिज, आणि सिमेंन्ट स्टिल हे वेस्ट १३८ किलोग्रॅम आहे आणि ग्रीन वेस्ट म्हणजे बायोवेस्ट हे २७७ किलो आहे. टोटल क्वॉन्टिटी १८४८ झाली. आपल्या वॉर्डमध्ये टोटल वेस्ट १८४८ किलो आहे. असे असतांना त्याचा गेल्या वर्षीचा टोटल खर्च रु. ४१,७२,५१२/- आहे. ह्यावर्षी रु. २२,६९,०००/- दाखविले जात आहेत. हा एवढा मोठा फरक कसा काय आला. आपल्या वॉर्डमध्ये जवळ जवळ रु. २० लाखाचा फरक आहे. मग आमच्या बाकीच्या नगरसेवकांच्या वॉर्डचा काय असेल त्यांचा विचार करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण जे सांगितलेले आहे, त्याबाबत अधिकाऱ्यांना बोलावून चर्चा करुन आपल्याला पुर्ण खुलासा मिळेल. मी स्वतः त्याची माहिती देईन.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जो ठराव पास केलेला आहे. त्याच्यामध्ये तुमची तरतुद आहे. आपल्या बजेटमध्ये आजमितीस असलेली तरतुद, बर्मन कमिटीचा अहवाल, लाड समितीच्या शिफारशी. आपल्याला जे कर्मचारी घ्यायचे ह्याचे आपल्याला कम्प्लशन आहे. त्या कम्प्लशननुसार त्यांनी सभागृहाला जो चार्ट दिलेला आहे. तो संपूर्ण सभागृहाची दिशाभूल करणारा आहे. मी माझा ठराव दिलेला आहे. तो व्यवस्थित वाचा. आपण ॲक्सेप्ट केला तर उत्तम, नाही केला तरी अगदी उत्तम होईल. मी दोन ठराव दिलेले आहेत. आपल्या शहरामध्ये पॉलिथीनच्या थैल्यांचा १०० टक्के नायनाट करण्याचा ठराव आहे. त्याचा एक ठराव आहे. दुसरा जो ठराव दिलेला आहे त्याच्यामध्ये बजेटची तरतुद आहे. ती बर्मन कमिटी आणि लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मी तुम्हांला कॉपी दिलेली आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही ठराव वाचुन घ्या म्हणजे सभागृहाला कळेल.

**मिलन म्हात्रे :-**

मी एक ठराव वाचतो. (ठरावाचे वाचन केले.)

**नयना म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव मी ठेवत आहे. तसे बघायला गेलो तर हा ठराव प्रशासनाच्या वतीने यायला पाहिजे होता. परंतु, तो आम्हांला आणावा लागलेला आहे. अजुन एक माझा ठराव आहे. (दुसऱ्या ठरावाचे वाचन केले.)

**नयना म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे जे कोष्टक दिलेले आहे, आम्ही त्याच्यामध्ये ज्या फिगर सांगितलेल्या आहेत हा बराच अभ्यास केलेला आहे. तुम्ही ह्याच्यामध्ये मोठे की आम्ही लहान हा प्रश्न नाही. हा ठराव आणि हे कोष्टक जरा बसून बघा. प्रशासनाने सरळ सांगितले की, ह्याला ऑडीटची परमिशन नाही. आपण हा ठराव अगोदरच पास केलेला आहे. माझ्या प्रस्तावावर विचार विनिमय करा. काय निर्णय द्यायचा तो द्या. आम्हांला रुलिंग द्या. एक प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा आहे आणि दुसरा आहे......

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, आपण दोन ठराव मांडले. पैकी स्थायी समितीने २० मायक्रॉनपेक्षा कमी असलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्याविषयी ठराव पारित केलेला आहे. आपण त्या ठरावाचे स्वागत करतो. आपण जो ठराव देता आहोत. आपण त्याच्यामध्ये कामगारांची संख्या लिहिता, त्याच्यामध्ये आकड्यामध्ये दिलेली कामगारांची, सफाई कामगारांची संख्या ४११६ ठेवावी असे आपण लिहिता. त्या आकड्यामुळे आपल्या मुळ ठरावात तफावत निर्माण होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या गोषवाऱ्यामध्ये ऑलरेडी ४११६ दिलेले आहे. मी स्वतः दिलेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही ठरावाचे व्यवस्थित वाचन करा. त्याच्यामध्ये २५ दिवसांची गरज टाकलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे असे आदेश आहेत की, ३० च्या ३० दिवस काम केले पाहिजे. त्याच्यामुळे तफावत येते. तुम्ही जे सांगता त्या हिशोबाने कामगार गुणिले २५ दिवस गुणिले आपण रक्कम पकडली तर त्या रक्कमेचा ताळमेळ जमतो. परंतु, आपण जे ३० दिवस पकडता त्याच्यामुळे हा डिफरन्स येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी कामगारांचे बोलतो. दिवस बाजूला राहिले. कामगारांच्या संख्येबाबत मी बोलतो.

**मा. उपमहापौर :-**

कामगारांची संख्या पकडतांना आपण दिवस पकडले असतील. मग आपला मेळ बसणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्याकडे लाड समितीच्या शिफारशीनुसार जी.आर. आहे. त्या जी.आर.मध्ये शहरातील लोकसंख्या भागिले कामगार एका हजाराच्या पाठीमागे पाच असे कामगार पकडायला गेलो तर बरोबर होते. परंतु, त्यांनी १७०० कामगार दिलेले आहेत. तुम्ही आपले कोष्टक चेक करा. तुम्हांला पाहिजे ४११६ कामगार, अख्ख्या मिरा भाईंदरमध्ये हवे आहेत. तुमच्या कोष्टकानुसार सतरा हजार कामगार मिळतात किंवा सतरा हजार काहीतरी आहेत. तुम्ही गणित करा आणि मला ह्याच्यावर रिझल्ट द्या. ४११६ कुठे, १७०० कुठे त्याला काहीतरी गणित बसले पाहिजे. आपण घंटागाड्या मागवतो. घनकचरा व्यवस्थापनासाठी गाडीवर किती वर्कर असावे ते सगळे आहे. बर्मन कमिटीचा अहवाल आहे. त्याचे जरा वाचन करा. त्यानंतर रु. १२४.२२ मजुरी देणे फार महत्त्वाचे आहे. सत्ताधाऱ्यांच्या युनियनच्या ह्यांनी दि. २२/०८/०५ राष्ट्रवादीला राष्ट्रवादीचा आहेर असे तुम्हाला पत्र दिलेले आहे. तुमच्या युनियनने तुम्हांला पत्र दिलेले आहे. तुमच्या कामगार युनियनचे पुढारी त्याच्यामध्ये असे म्हणतात की, कामगार वगैरे प्रशासनाला जागे करुन कामगारांना न्याय मिळविण्यासाठी धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. असे राष्ट्रवादीची युनियन म्हणजे आम्ही म्हणत नाही. त्यांनी ह्याच्यामध्ये क्लिअर दिलेले आहे. हे सत्ताधारी पक्षाचे लेटर आहे. राजकारणाचा प्रश्न नाही. रु. १२४.२२ हा तुमचा मिनिमम रेट देणे तुम्हांला बंधनकारक आहे. तुम्हांला कोष्टकानुसार जे कामगार ठेवायचे आहेत, आम्ही त्याबद्दल काहीही म्हटलेले नाही. आम्ही म्हटलेले आहे की, तुम्ही एग्जिस्टींग पॉप्युलेशननुसार कामगार ठेवा. मा. उपमहापौर साहेब, आपल्या ऑडीटर साहेबांचे ह्याच्यावर कुठेही ओपिनियन घेतलेले नाही.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आलेले आहेत. ठराव मतदानाला घेण्यात यावा.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने. प्रकरण क्र. ३० करिता दोन ठराव आलेले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दोन ठराव मतदानाला टाकायला, दोन्ही ठराव परस्पर विरोधी असावे लागतात. तुम्ही जो पहिला ठराव दिलेला आहे त्याला विरोध करणारा ठराव त्यांनी दिलेला नाही. आपल्याकडे ॲडीशनल बाबी कराव्यात असा ठराव त्यांनी दिलेला आहे. म्हणून हा परस्पर विरोधी ठराव नसल्यामुळे ह्याला मतदानाला टाकायचा प्रश्न येत नाही. आपण त्यांच्या दुसऱ्या ठरावाबाबत प्रशासनाशी सल्लामसलत करावी आणि त्यानुसार सुचना देऊन पुन्हा आणा हे योग्य आहे. प्रत्येक ठराव एकमेकांसमोर करु नका. आमचा एक विषय होता सन्मा. विधी अधिकाऱ्यांनी काही माहिती देण्या संदर्भात होता. मघाशी सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी सांगितले की, त्यांना कृपया खुलासा करायला लावा. विधी सल्लागार ते काम करायला लावा. पहिल्यांदा मा. उपायुक्तांना खुलासा करु द्या नंतर बाकीचे करतील.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एस्. ए. खान आणि सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांनी मांडलेला पहिला ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी दिलेली दुरुस्ती उपसुचना म्हणून त्याच्यामध्ये ॲड करण्यांत आलेली आहे.

**मोहन पाटील :-**

आपण ४००० लेबर घेणार का? सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी ४००० सफाई कामगार नेमावे असे सांगितलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सुचविलेला नाही. आपला गोषवारा वाचा. त्याच्यामध्ये आपण ४००० बोलतात मी ११६ अजुन वाढवा असे बोलतो.

**मा. महापौर :-**

ज्या आवश्यक सुचना आहेत. त्या सुचना घेतल्या जातील.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेव्हा मा. महापौरांनी डिक्लेअर केले तेव्हा त्यांच्या अधिकारामध्ये सुचना घेण्याची आवश्यकता वाटली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांनी जे रुलिंग दिलेले आहे ते आम्हांला मान्य आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर आहे. सचिव पुढील विषय घेण्यांत यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आमचा विषय पेन्डींग आहे. तुम्ही जी माहिती मागवणार होतात ती माहिती मागितली का? या ठिकाणी विधी अधिकारी उपस्थित आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या प्रश्नाचे उत्तर दोन विषय झाल्यानंतर शेवटी देण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आपला जो पहिला ठराव आहे तो ठराव आपण किती वर्षासाठी फायनल केलेला आहे.

**प्र. सचिव :-**

आम्ही तो ठराव एक वर्षासाठी फायनल केलेला आहे.

**प्रकरण क्र. ३० :-**

महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक साफसफाई व घनकचरा वाहतुक ३ वर्षाकरिता खाजगीकरणातून करणेबाबत.

**ठराव क्र. ३२ :-**

मा. आयुक्त सोा. यांचेकडील वरील विषयाच संदर्भातील टिपणीचे वाचन करण्यांत आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ७९ चौ. कि. मी पसरले असुन शहराची वस्ती दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिका क्षेत्राची लोकसंख्या सन २००१ चे जनगणनेनुसार ५,२०,०००/- इतकी आहे. या शहराचा विकास झपाट्याने होत असून लोकसंखेमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. आजमितीस या शहराची अंदाजीत लोकसंख्या ७,५०,०००/- च्या आसपास आहे. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात लहान मोठे औद्योगीक क्षेत्र या क्षेत्रात सतत मोठमोठ्या इमारती, गृहनिर्माण संकुलने व संस्था निर्माण होत असून भविष्यकाळात देखील शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढणार आहे. शहरामध्ये उघड्यावर मोठ्या प्रमाणावर बाजारपेठा असून, त्याचबरोबर शहरामध्ये असलेल्या मनपाच्या मंडईमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर बाजार भरत असून त्यातुन मोठ्या प्रमाणावर कचरा निघत आहे. मनपाकडे असलेले सफाई करण्यास अपूरे पडत असल्याने मनपाचे सन २००३-०४ पासून शहरातील दैनंदिन साफसफाई खाजगी ठेकेदारांमार्फत प्रभाग सफाई करुन घेतली जात आहे. खाजगी ठेकेदारामार्फत शहरातील होत असलेली साफसफाई परिणामकारक होत असल्याचे दिसून येत आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या दैनंदिन निघणारा कचरा व कारखान्यातील टाकाऊ माल हा देखील मोठ्या प्रमाणावर असल्या कारणाने वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत कच-याचे प्रमाण देखील वाढत आहेत व भविष्यकाळात देखील वाढणार आहे. वाढत्या वस्त्यांमधून निर्माण होणारा कचरा, शहरातील रस्त्यांची व गटारांची लांबी शहराचे वाढते क्षेत्र याचा विचार करता मनपा क्षेत्रात वाढीव कामगारांची आवश्यकता आहे.

वाढीव कामगारांची आवश्यकता विचारात घेवून प्रस्तावामध्ये प्रभाग निहाय प्रस्तावित केलेले कामगार बरोबर आहेत. साफसाफाई दैनंदिन करने आवश्यक असल्याने वर्षाचे ३६५ दिवस प्रस्तावित केलेले कामगार उपलब्ध करणे आवश्यक आहे. मनपाकडे स्वतःचे कामगार पुरेसे उपलब्ध नसल्याने व असलेले कामगार अन्य आवश्यक ठिकाणी असल्याने खाजगीकरणातुन प्रभाग सफाई करुन घेतली जात आहे. खाजगीकरणातुन प्रभाग सफाई समाधानकारकरित्या होत असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तावामध्ये प्रभाग निहाय रस्ते, गटार व वाहनावरील कामगार व वाहने प्रभाग निहाय प्रस्तावित केली आहेत. सदरहू कामगार वर्षाचे ३६५ दिवस साफसफाईसाठी उपलब्ध करण्यास व येणाऱ्या खर्चास मंजूरी देत आहे. मनपा क्षेत्राची प्रभागातील दैनंदिन साफसफाईची कामे खाजगीकरणामार्फत एक वर्षे मुदतीसाठी करुन घेणेस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे. सदरहू कामी होणारा खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीतील वॉर्ड साफसफाईच्या लेखाशिर्षाखाली करुन घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

सदरकामी निविदा जादा दराच्या आल्यास अथवा टेन्डर पुन्हा मागविण्यात आल्यास निविदा प्रक्रियेस उशिर होण्याची शक्यता आहे. सदर कामाची मुदत दि. ३१/८/२००५ रोजी संपत आहे. येत्या महिन्यामध्ये सार्वजनिक उत्सव तसेच नवरात्रौत्सव साजरा होणार आहे. सदर उत्सव मनपा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा हातो. सदरकामी साफसफाई कामाची मोठ्या प्रमाणावर गरज असते मात्र निविदा मागविण्यात किंवा निविदा प्रक्रियेस उशिर झाल्यास सध्या चालु असलेल्या प्रभाग सफाई कामास पुढील निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत मुदत वाढ देण्यांत ही सभा मंजूरी देत असून सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षाखाली तरतुदीमधुन वर्ग करण्यास पुर्नविनियोजनास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. शफीक अहमद सादत खान.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३१ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौरांच्या परवागीने बोलतो की, असे ठराव गेल्या वेळेला स्टँडिंगला झालेले आहेत. त्याच्यामध्ये सफाई कामगार, पाणी खात्याचे कामगार, कर खात्याच्या कामगारांनी अतिरिक्त काम केलेले आहे. त्यांचाही समावेश ह्याच्यामध्ये करुन घ्यावा. अग्निशमन दलाचा ठराव आहे. परंतु, गेल्या स्टँडिंगमध्ये आरोग्य खात्याचे कामगार, कर खात्याचे कामगार, पाणी खात्याचे कामगार यांनी हे अतिरिक्त काम केलेले आहे. तो एक ठराव झालेला आहे. तो ठराव स्थायी समितीला पास झालेला आहे. या ठिकाणी त्याचा समावेश करावा त्याही कामगारांना पगार द्यावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ५३ अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना सार्वजनिक आणि शासकीय सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला अदा करणेबाबत मा. स्थायी समितीने शिफारस केलेला ठराव आहे. (ठरावाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम, मी केलेल्या सुचना ह्याच्यामध्ये ॲड करा.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या कामातील मोबदला मिळणेबाबतचा सदर विषय आज स्थायी समितीकडून महासभेत आलेला आहे. स्थायी समितीला ह्या सभागृहाने महासभेने रु. ५० लाखाचे अधिकार दिलेले आहेत. ते अधिकार दिले असतांना त्यांनी हा प्रस्ताव या ठिकाणी पाठवायला नको होता. त्यांनी स्थायी समितीमध्ये मंजुरी द्यायला पाहिजे होते. परंतु, त्यांनी तसे न करता या सभागृहापुढे हा प्रस्ताव पाठविलेला आहे. हा एक चांगला विषय आहे. ज्या कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी खरोखर कामे केलेली आहेत. अशांना मोबदला मिळायला पाहिजे. त्याचबरोबर आरोग्य विभागातील कर्मचारी, पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी, वन विभागातील कर्मचारी आणि कर विभागातील कर्मचाऱ्यांनीसुद्धा कामे केलेली आहेत, त्यांनासुद्धा हा सुट्टीचा मोबदला मिळावा असे मी जाहिर करतो. हा विषय स्थायी समितीला झालेला आहे. मग हे दोन्ही प्रस्ताव सभागृहापुढे एकत्रित का आणलेले नाही. एकच प्रस्ताव आणायचे काय गौडबंगाल आहे का? सगळे प्रस्ताव आणायला पाहिजे होते. सगळे प्रस्ताव एकत्रित आणा. आपण आणणार असे जाहिर करा. आपण निवेदन द्या.

**धनराज अग्रवाल :-**

महापौर मॅडम, कर्मचारीयोने जो एक्स्ट्रा काम किया है। उसका पैसा उनको मिलना चाहिए। इससे पुरा सभागृह सहमत है। लेकिन यह जो गोषवारा आया हुआ है वह सभापती का आया हुआ है। स्थायी समिती का गोषवारा है। उसमे मा. आयुक्त साहब की क्या भुमिका है। वह कुछ भ लिखा नही है। और लेखापाल की क्या भुमिका है वह कुछ भी लिखा नही है। १९९५ से २००३ तक हम लोग दे सकते है या नही दे सकते है। कानुन अधिकार है या नही उसकी भुमिका आप मुझ स्पष्ट किजिए। लेखापाल आणि आयुक्तांनी सांगावे, हे बरोबर आहे तर ठिक आहे. कायद्याच्या दृष्टीने ठिक आहे तर ठिक आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, इसके बारे मे लेखापाल और विधी सल्लागार को बोलने को बोलो।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल, स्थायी समितीमध्ये या विषयाची सविस्तर चर्चा झालेली आहे. आपला असा विषय आहे की, या कर्मचाऱ्यांनी खरोखर चांगले काम केलेले आहे. त्या कामाचा मोबदला त्यांना दिला पाहिजे. आपण त्यांना बक्षिस देतो अशातला भाग नाही. त्यांना त्यांचे हक्क देण्याबाबत आपला एवढा आक्षेप घेण्याचे कारण नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आपण चुकीचे का मांडता. मी सांगतो की, पैसे दिले पाहिजे. परंतु, कानुनी प्रावधान आहे की, नाही ते मी विचारतो.

**मा. उपमहापौर :-**

प्रावधान आहे अशी चर्चा करुनच ते केलेले आहे. त्यात चिंता करण्याचे कारण नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

उसमे आप क्या बोलते है? जो अधिकारी बैठे है उनको बोलने दिजीए।

**धनराज अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेबांनी आपले मत का मांडले नाही. त्या कर्मचाऱ्यांना मोबदला दिला पाहिजे असे मा. आयुक्त साहेबांनी आपले मत मांडावे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

कानुनी प्रावधान नही इसमे ठराव किया है।

**मा. उपमहापौर :-**

तुम्हांला तसे मंजूर नसेल तर दुसरा ठराव मांडा.

**धनराज अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब, तुम्ही उलट बोलतात. मी फक्त एवढेच विचारलेले आहे की, कानुनी प्रावधान असेल तर ठिक आहे.

**मा. उपमहापौर :-**

ह्या विषयावर स्थायी समितीची चर्चा झालेली आहे. स्थायी समितीच्या मान्यतेने हा विषय आलेला आहे. सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस यांचे मत असे होते की, इतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या काही गोष्टी बाकी आहेत. परंतु, विषयपटलावर हा विषय नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझे म्हणणे तसे नाही. तसा ठराव झालेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

ज्यांचे जसे मत असेल तसे मत त्यांनी स्थायी समितीवर आणावे. स्थायी समितीच्या शिफारशीनंतर हे प्रकरण आपल्याकडे घेऊ या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठराव स्थायी समितीमध्ये पास झालेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

मग आपल्याला तो विधीवत विषयपटलावर आणावा लागेल.

**चंद्रकांत मोदी :-**

आरोग्य खातेने अग्निशमन दल के साथ काम किया है। इसमे जो सफाई कामगार है, उनका भी समावेश किजिए। यह मेरी सुचना है।

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सन १९९५ पासून २००३ पर्यंत आपल्या अग्निशमन दलातील कामगारांनी काम केलेले आहे. त्यांना आजपर्यंत एक्स्ट्रा कामाचा मोबदला मिळालेला नाही. आज तो विषय स्थायी समितीने सभागृहापुढे आणलेला आहे. त्याच्याबद्दल मी स्थायी समितीचे अभिनंदन करते. आमचा कर्मचारी वर्ग अशा प्रकारचे एक्स्ट्रा काम या पालिकेमध्ये करत असेल तर असे विषय सभागृहामध्ये शिफारशीने वारंवार यायला पाहिजेत. त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला जरुर मिळायला पाहजे. आज अग्निशमन दलाने इतकी वर्षे काम केलेले आहे. आपण त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवलेले आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये त्यांना शिफारस करुन मान्य करण्याच्या भुमिकेमध्ये सभागृह आहे असे मला वाटते. असे केल्याने त्यांचा खऱ्या अर्थाने गौरव होईल. कारण आपण पाहिले की, दि. २६ जुलै ते दि. ५ ऑगस्टपर्यंत या मिरा भाईंदर शहरामध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये पालिकेच्या मार्फत जर अधिकाऱ्यांपैकी कोणी काम केले असेल तर ते काम अग्निशमन विभागाने केलेले आहे. अग्निशमन दलाचे जे अधिकारी कार्यरत होते, कर्मचारी होते, त्यांना मी प्रत्यक्षात अनुभवलेले होते. कारण सदर पुरग्रस्त भाग हा माझा प्रभाग होता. या माझ्या प्रभागामध्ये २६ तारखेपासून अग्निशमन दल अहोरात्र मेहनत करित होते. आपण जी प्रेते क्षणभर बघायला घाबरु किंवा आपण क्षणभर ती प्रेते पाहू शकणार नाही अशा प्रेतांना, तीन-तीन दिवसांच्या सडलेल्या प्रेतांना अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी बाहेर काढलेले आहे. त्यावेळेला त्यांनी स्वतःच्या जीवाची तमा बाळगली नाही आणि त्यांनी अतिशय मेहनतीने काम, कुठल्याही प्रकारची तक्रार न करता केलेले आहे. वर्षभर पगार खाता असे काही वेळेला म्हटले जाते. परंतु, ते चुकीचे आहे. कारण ज्या वेळेला कुठलीही नैसर्गिक आपत्ती येते, जशी आग लागते, पुर येतो, अपघात होतात, झाडे पडतात अशा वेळेला काम करण्यासाठी अग्निशमन दल हे सर्वात पहिल्यांदा पुढे होते. आपण कधी-कधी बघतो की, अग्निशमन दलाचे कामगार बसलेले असतात. परंतु, ते बसलेले नसतात ते नेहमी सैनिकांसारखे तयारीमध्ये असतात. त्यांना कधी कधी अन्न मिळत नाही. त्यांना उपाशी काम करावे लागते. अशा वेळेला आपण त्यांची जी मेहनत पालिकेच्या मार्फत घेतलेली आहे. आपण सर्व नगरसेवक अपेक्षा करतो की, त्यांनी मेहनत केली पाहिजे. परंतु, आज त्यांना मोबदला देण्याची वेळ आली तर आपण मागे हटता कामा नये. मी सभागृहाला विनंती करीत की, आपल्याला त्याचा जो काही मोबदला द्यायचा आहे तो मोबदला कायदेशिररित्या आणि योग्य तो निर्णय घेऊनच द्यायला पाहिजे. मा. महपौर मॅडम आणि सभागृहाला मी अशी विनंती करते की, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांनी आणखी चांगल्या जोमाने काम करण्यासाठी आपण ह्या सभागृहामध्ये हा विषय मंजुर करावा. जेणेकरुन, आपल्या या पालिकेमध्ये

असलेले दुसरे कर्मचारी वर्ग आहेत. त्यांना त्या प्रकारचे प्रोत्साहन मिळेल आणि यापुढे सुट्टीच्या दिवशी कामकाज करतांना कोणीही डगमगणार नाही, घाबरणार नाही किंवा चांगल्या पद्धतीने काम करतील. आजच्या सभेमध्ये मी विनंती करतो की, कृपया सदरचा विषय मंजुर करुन घ्यावा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांविषयी फार चांगले आणि अनुभवाचे बोल सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हंसनाळे यांनी सांगितलेले आहे आणि संपूर्ण सभागृहाने त्यांचे स्वागत केलेले आहे. तसेच, त्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदनसुद्धा केलेले आहे. सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हंसनाळे यांनी त्यांचा अनुभव अनुभवलेला आहे. परंतु, आपल्याला कल्पना करायला हरकत नसावी की, त्यांनी केलेल्या कामाचा फक्त मोबदला आपण त्या कर्मचाऱ्यांना देतो. त्या कर्मचाऱ्यांनी अतिवृष्टीमध्ये जे काम केलेले आहे. आपल्याला त्या कामाला नजरेआड करुन चालणार नाही. म्हणून मी पुढे जाऊन असे म्हणतो की, येणाऱ्या आगामी वर्षामध्ये या कर्मचाऱ्यांना शौर्य पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यांत यावा असा प्रस्ताव मी आपल्यासमोर ठेवते. त्याचा आपल्याकडून यथोचित सन्मान केला जावा असा मी ठराव मांडते.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या ठरावाचे मी स्वागत करते आणि अशा प्रकारे अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना शौर्य प्रदान करण्याची आपण पुढील वर्षी शिफारस करु.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या महानगरपालिकेमध्ये जे कर्मचारी आहेत, त्यांनी त्या प्रसंगामध्ये काम केलेले आहे. मुंबईमध्ये ज्या ज्या लोकांना पुरग्रस्त परिस्थितीमध्ये ड्युट्या केलेल्या आहेत. त्या बहुतेक लोकांना लेप्टोस्पायरसीसचा आजार झालेला आहे. मी स्थायी समितीला सदस्य असतांना मेडीक्लेम पॉलिसी अत्यावश्यक सोयींना लागू करा असे सांगितले होते. सन्मा. सदस्य. चंद्रकांत वैती साहेब त्या वेळेला स्थायी समितीला आमच्याबरोबर होते. परंतु, ते सगळे बारगळले. त्याचासुद्धा विचार केला तर खुप चांगले होईल. कारण फायरब्रिगेडबरोबर आपल्या छोट्या सफाई कामगारापासून एस.आय.ने वगैरे सगळ्यांनी भरपूर काम केलेले आहे. त्याकरिता आपल्याला ती सोय महापलिकेच्या वतीने देता आली तर फार नॉमिनल इन्स्टॉलमेंट बसतो. एक कॅश रिवॉर्ड म्हणा किंवा आपण जी आर्थिक मदत करणार आहोत त्यापेक्षा आपण त्यांना मेडीक्लेमची पॉलिसी काढून दिली. तर आपण त्यांना त्यापेक्षा दहा पटीने मदत केल्यासारखे होईल. या माझ्या सुचना आपण ह्याच्यामध्ये ॲड करु त्याचा विचार करावा अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

**मा. महापौर :-**

आपल्या सुचनांचा नक्कीच विचार केला जाईल. पुढील विषय घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. ३१ :-**

अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक व शासकिय सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या कामाचा मोबदला अदा करणेबाबत. (मा. स्थायी समितीने शिफारस केले प्रकरण.)

**ठराव क्र. ३३ :-**

अग्निशमन दल हे अत्यावश्यक सेवा असून २४ तास कार्यरत राहणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अग्निशमन दल २४ तास कार्यरत असते. परंतु, सदर विभागातील कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशीही कर्मचाऱ्यांना कामकाज करावे लागते. ह्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला कर्मचाऱ्यांना मिळत नाही. अग्निशमन दलात फक्त ११ पदे मंजूर आहेत. उर्वरीत कामगार हे सफाई कामगार व मजुर ह्या पदावर काम करीत आहेत. मुख्य कार्यालयात काम करणाऱ्या सफाई कामगार किंवा मजुर ह्या कर्मचाऱ्यांना सर्व शासकीय व सार्वजनिक रजा उपभोगता येतात. परंतु, अग्निशमन दल अत्यावश्यक सेवा असल्याने २४ तास कार्यरत राहणेसाठी अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना आपले काम चोखपणे पार पाडावे ह्याकरिता प्रशासनातील अधिकारी व नगरसेवक अपेक्षा बाळगून असतात. अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना काम करण्यास स्फुर्ती मिळावी म्हणून आपण त्यांना शासकीय व सार्वजनिक रजेच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला दिल्यास इतर विभागातील कर्मचारीसुद्धा अग्निशमन दलात काम करण्यांस पुढे येतील.

तरी अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या कामाचा मोबदला म्हणून (सन १९९५ ते डिसेंबर २००३) पर्यंतची रक्कम रुपये १५,९१,२०३/- एवढी अदा करणेस व अग्निशमन दलातील शासन निर्णयानुसार देण्यांत येणारे इतर भत्ते देण्यांस ही महासभा मंजूरी देण्यांत येत आहे.

त्याचप्रमाणे यापुढे अग्निशमन दलातील कर्मचारी यांनी वेळोवेळी सार्वजनिक व शासकीय दिवशी केलेल्या कामाचा अतिरीक्त मोबदला त्यांना देण्यांस ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. शशिकांत ज. भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३२ चे वाचन केले.)

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदया, प्रकरण क्र. ३२ से संबंधित काफी समय से इस तरह की आवश्यकता इस शहर को थी। यहाँ फायर ब्रिगेड और अन्य तरह की सुविधाओं के लिए जगह देख करके वहाँपर इस तरह का इंतजाम किया जाए। (ठरावाचे वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, माझा जो विषय होता व मी जो प्रश्न विचारलेला होता त्याबाबत विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ३२ :-**

सिल्व्हर पार्क येथे पाण्याच्या टाकीच्या आवारात नव्याने अग्निशमन स्थानक उभारणे व फायर टेंडर रेस्कुवाहन व इतर आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ३४ :-**

अग्निशमन दल अत्यावश्यक सेवा आहे. सदरचे दल आगीपासून व नैसर्गीक आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी २४ तास कार्यरत असते व ते सुसज्ज ठेवणे आवश्यक आहे. सध्या मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फक्त एकच अग्निशमन स्थानक असून ते ६० फुट रोड, भाईंदर (प.) येथे आहे. स्टँडींग ॲडव्हायझरी कॉन्सिल यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक १० चौ. किमी ला १ अग्निशमन स्थानक असणे आवश्यक आहे. तथापी आपल्याकडे एकच अग्निशमन स्थानक कार्यरत आहे.

भाईंदर (पू.) कडे नव्याने अग्निशमन स्थानक उभारणेसाठी अनेक नागरीकांची व मा. नगरसेवकांची मागणी होत आहे. त्यासाठी सिल्व्हर पार्क, पाण्याची टाकी (मिरारोड) येथील जागा अग्निशमन स्थानकासाठी सर्व बाबींचा विचार केला असता सदरच्या जागी पाण्याची उपलब्धता, लोकसंख्या, रस्ता इ. सोयीस्कर आहे. सदर ठिकाणी अग्निशमन स्थानक उभारण्यासाठी २० x १५ मिटर इतकी जागा उपलब्ध असून त्या जागेवर तळमजला + २ मजले (अग्निशमन तळ + कर्मचारी निवासस्थान) बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदरच्या जागेवर अग्निशमन स्थानक उभारणे साठी पाणीपुरवठा विभागाने ना हरकत दाखला दिलेला आहे. नगररचना विभागाने सदर ठिकाणी अग्निशमन स्थानक उभारण्याकरीता हरकत नाही असे अभिप्राय दिलेले आहेत.

अग्निशमन स्थानक उभारणेसाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात 'अग्निशमन इमारत बांधकाम करणे' या शिर्षकाखाली चालू वर्षा ३०.०० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर ठिकाणी अग्निशमन स्थानक उभारण्यास पूर्णपणे येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळावी.

साधन सामुग्री व भांडारे यांची खरेदी करणेसाठी सन २००५-२००६ आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात ५०.०० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नवीन फायर फायटर खरेदी करणेसाठी अंदाजपत्रकात १०० लाखांची तरतूद करणेत आली. नियोजित ठिकाणी अद्यावत अग्निशमन स्थानक उभारणेस तसेच १ फायर फायटर, १ रेस्क्यू वाहन व इतर आवश्यक साहित्य खरेदी करणेस ही मा. महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. महेंद्रसिंग चौहाण. अनुमोदन :- ॲड. श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३३ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांचा दि. ५ ऑगस्ट २००५ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या प्रस्तावाचे मी वाचन करते. एम.जी.पी.कडील ५० दशलक्ष योजनेतील प्रलंबित कामे निधी उपलब्ध करुन घेऊन पुर्ण करुन घेणे याबाबतचा प्रस्ताव त्यांनी 'ज' खाली प्रश्न दिलेला आहे. प्रकरण क्र. ३४, सन्मा. सदस्या अनिता पाटील यांच्या प्रस्तावाचे मी वाचन करते. दि. ०५ ऑगस्ट २००५ रोजीचे पत्रान्वये वाल्मीकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत विस्थापित झालेल्यांचे पुनर्वसन करणे बाबतचा 'ज' खाली प्रस्ताव दिलेला आहे. सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी दि. ०५ ऑगस्ट २००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षकांना कायमस्वरुपी नेमण्या करिता आस्थापनेवर २८ पदे निर्माण करण्याकरिता दिलेला प्रस्ताव मान्यतेबाबत. तसेच सन्मा. सदस्य स्टिवन जॉन मेंन्डोंसा यांनी दि. ५ ऑगस्ट २००५ रोजी 'ज' खाली दिलेला प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा/इमारती/समाज मंदिरे सुट्टीच्या वेळेस भाड्याने देण्याबाबत. सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांचा दि. ५ ऑगस्ट २००५ रोजीचा दिलेला प्रस्ताव, राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगतच दोन्ही बाजुनी सर्व्हिस रोड हस्तांतरण करुन घेणे. दिलेले संबंधित प्रस्ताव महत्त्वाचे आणि धोरणात्मक असे चांगले निर्णय आहे. तो सभागृहापुढे रितसर यावा अशी माझी, सभागृहाची इच्छा आहे. तुम्ही पुढील सभेमध्ये गोषवाऱ्यासहित विषय घ्यावा. प्रशासनाकडून याचा गोषवारा मागवून घ्यावा. हा विषय रितसर घेण्यांत येईल. त्यामुळे आता प्रस्ताव घेण्यांत येत नाही.

**शशिकांत भोईर :-**

मी प्रश्न विचारलेला होता त्याबद्दल विधी सल्लागारांनी निवेदन करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पहिल्यांदा सहाय्यक आयुक्त साहेबांनी निवेदन केले तरी चालेल. त्यांचे निवेदन झाल्यानंतर विधी सल्लागारांनी त्याच्यावर मार्गदर्शन करावे.

**रमेश मनाळे (मा. सहाय्यक आयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आपला प्रश्न जर परत रिपीट झाला तर स्पष्टीकरण देता येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी स्थायी समितीने प्रकरण क्र. १५३, ठराव क्र. १६६(अ) अन्वये काही कर्मचाऱ्यांना ते ज्या दिवसापासून ठेकेदाराकडे काम करत होते त्या दिवसापासून त्यांना सेवाजेष्ठता दिलेली आहे. या तीन कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठता दिल्यानंतर यांची सेवा जेष्ठता दिल्यामुळे जे कर्मचारी बाधित होत होते, उदाहरणार्थ, श्री. राठोड हे कोर्टात गेले. ते कोर्टात जाण्यापुर्वी ज्यांना पदोन्नती सेवाजेष्ठतेमध्ये प्राधान्य क्रमांक दिलेला आहे त्यांनी कोर्टात जाऊन कोर्टाचे एक्स पार्टी डिसीजन आणला. पलिकेच्या अधिकाऱ्यांना या संदर्भात काहीही माहिती नाही. आपल्याकडे विधी खाते आहे, विधी अधिकारी आहेत. परंतु, कोर्टामध्ये तीन वेळा केस आली, मी संक्षिप्तमध्ये सांगतो, आपण उल्लेख केल्यानंतर मला पुन्हा बोलायला संधी द्या आणि एक्स पार्टी निकाल लागला. ह्या एक्स पार्टी निकालावर समोरचा कर्मचारी श्री. किरण राठोड, जो बाधित होत होता त्या कर्मचाऱ्यानेसुद्धा कोर्टात धाव घेतली. आपण त्या न्यायालयात आपल्यातर्फे कोण वकिल हजर झाले. त्यांना ह्या दाव्यामध्ये पालिकेतर्फे जे रिटर्न स्टेटमेंन्ट सादर करावे लागले त्या रिटर्न स्टेटमेंवर कोणाची सही आहे. आता जो काही कोर्टाने आदेश पारित केलेला आहे. तो आदेश आपल्याला लागु झाला आहे का? आपण त्याच्यावर अपिल करणार आहात की केला आहे की नाही, ह्याची सविस्तर माहिती द्या. म्हणजे पहिल्यांदा स्थायी समितीचा ठराव १६६(अ) त्याच्यावर प्राधान्य क्रमांक दिलेल्या कर्मचाऱ्यांनी कोर्टामध्ये केलेला दावा. त्याच्यावर झालेला एक्स पार्टी निकाल. त्या निकालाच्या विरोधात जो बाधित झालेला कर्मचारी श्री. राठोड यांनी केलेला दावा. आपल्यातर्फे त्या दाव्यात कोण वकिल होते, कोणी रिटर्न स्टेटमेंट फाईल केले. त्याच्यावर काय निर्णय झाला. जो निर्णय झाला तो निर्णय आपण ॲप्लिकेबल केला किंवा आपण त्याच्या विरोधात कोर्टात जाणार आहोत. ह्याच्यामध्ये सविस्तर माहिती द्या.

**रमेश मनाळे (मा. सहाय्यक आयुक्त सो.) :-**

स्थायी समिती सभेत ठराव १६६(अ) नुसार असा ठराव झालेला होता की, या पालिकेच्या आस्थापनेवर तीन जे.ई. आहेत त्या तीन जे.ई.नी त्यांच्या ठेकेदाराकडे पुर्वी केलेली सेवा त्यांना जोडून मिळावी आणि त्याची सिनिअरिटी त्यांना ठेकेदाराकडे जी सेवा केलेली आहे त्या काळापासून गृहित धरावी, असा एक ठराव होता. तो मंजुर केलेला आहे. असा ठराव करतांना त्याच्यामध्ये मेन्शन केलेले होते की, यापुर्वी शासनाने महानगरपालिकेच्या ठेका पद्धतीने काम करणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यांची मागील सेवा कायमस्वरुपी नेमणुक करणाऱ्या प्रस्तावास यापुर्वी मान्यता दिलेली आहे. आपल्याकडे असा ठराव झालेला आहे. हा ठराव नंतर कमिशनर साहेबांच्या निदर्शनास आल्यानंतर प्रशासनाने हा कुठलाही ठराव दिलेला नव्हता. तो ठराव कमिशनर साहेबांनी ४५१ खाली रद्द करणेबाबत शासनाला पाठविला. सदर ठराव रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाला दिला आणि दरम्यानच्या कालावधीमध्ये सदरच्या कर्मचाऱ्यांनी इंडस्ट्रियल कोर्टामध्ये धाव घेतली. त्यांनी इंडस्ट्रियल कोर्टाकडून डिसीजन आणला की, सदर बाबतीत ह्यांची जेष्ठता गृहित धरावी. त्याप्रमाणे सिनिअरिटी लीस्ट सुधारित करुन द्यावी हे इम्प्लिमेंन्ट केले जावे. मग असा डिसीजन झाल्यानंतर आपण

अपिलात गेलो. अपिलात गेल्यानंतर परत ह्या प्रकारची सुनावणी झाली. कारण तो डिसीजन त्यावेळेचा इंटरिम डिसीजन होता. आपण परत अपिल केल्यानंतर कोर्टाने परत ते जजमेंन्ट दिले. आपण वस्तुस्थिती कोर्टाच्या निदर्शनास आणल्यानंतर त्याच्या ॲप्लिकेशनची जी सिनिअरीटी लिट बॅकडेटपासून जी गृहीत धरायची होती ती रिजेक्ट केली गेली. दरम्यानच्या काळात सदर प्रकरणामध्ये श्री. राठोड हे स्वतः अफेक्टेड होते. म्हणून त्यांनी ह्या मॅटरमध्ये इन्टरव्हेन्ट केलेले होते. अशा प्रकारे कोर्टाने नंतर हे मॅटर रिजेक्ट केले. त्या प्रकरणी आपले वकिल श्री. जाली सादगी हे होते. परंतु, आपल्याला ज्यावेळेला अपिल करायचे होते त्यावेळेला ते उपलब्ध नव्हते. आपल्याकडे फार कमी कालावधी होता. दरम्यानच्या कालावधीत तीन जे.ई. होते. आपल्या विरुद्ध कन्टेम्प्टची नोटीस दिलेली होती की, आमचा निकाल इम्प्लिमेंन्ट केला जात नाही. ह्या कन्टेम्प्टची कार्यवाही आपल्यावर का केली जाऊ नये. आपल्याकडे फार कमी कालावधी होता. दरम्यानच्या काळात आम्ही स्वतः फोनवर बोललो, साहेब बोलले, विधी सल्लागार बोलले, श्री. जाली सादगी साहेब त्यावेळेला कोकणात कुठेतरी दौऱ्यावर गेलेले होते. ते येणे शक्य नव्हते असे त्यांनी सांगितले. दरम्यानच्या काळात मी स्वतः कोणी ज्युनिअर अटेन्ड करु शकतात का? ह्या बाबतीमध्ये कोणी हे केलेले नाही. विधी सल्लागारांनी साहेबांचे अपिल घेऊन दुसऱ्या एका वकिलाची त्या ठिकाणी नेमणुक केली आणि हे प्रकरण त्यांच्याकडे सोपविले.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एका विधी विभागाच्या कामकाजाची पद्धत बघितल्यानंतर फार मोठे आश्चर्य वाटते की, एवढी मोठी महानगरपालिका, एवढा मोठा पगार देऊन ही पदे निर्माण केली. त्याच्यावर नियुक्त्या केल्या. मनाळे साहेबांनी जे निवेदन केले, त्यांच्या निवेदनाशी सुसंगत परंतु, परिस्थिती नेमकी विरोधात आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, ज्यावेळेला प्राधान्य क्रमांक देणार, स्थायी समितीने चुकीचा ठराव केला. त्याला तत्कालीन आयुक्त साहेबांनी तो ठराव रद्द करण्यासाठी तो ठराव शासनाकडे पाठविला असा ठराव शासनाकडून निष्काशित किंवा सस्पेंन्ड झाला नाही. तो व्हायला किती महिने लागतात ते सर्वांना माहिती आहे. त्याचा फायदा मधल्या काळात घेतला की, जेव्हा शासनाकडून तो ठराव सस्पेंन्ड होईल तेव्हा होईल. तोपर्यंत आपण कोर्टात जाऊ या म्हणून हे तीन कर्मचारी कोर्टात गेले. आपल्याला ह्याच्या तारखा सांगतो. ठराव झाला ती तारीख दि. ३ मार्च २००५ आहे. दि. ३ मार्च २००५ पासून जे कर्मचारी कोर्टात गेले. पहिल्यांदा १५ एप्रिल तारिख लागली. दि. ३ मार्च ते १५ एप्रिलपर्यंत आमचा विधी विभाग संपूर्ण झोपलेला होता. दि. १५ एप्रिलमध्ये केस पहिल्यांदा बोर्डावर आली. त्यांनी त्याच्यापुर्वी केस दाखल केली. ज्यावेळेला केस दाखल होते त्यावेळेला त्याची प्रत ही महापालिकेला सर्व्हिस करावी लागते. याचा अर्थ १५ दिवस अगोदर केस दाखल झाली. त्यांची महापालिकेला सर्व्हिस झाली. महापालिकेच्या विधी सल्लागारांनी झोप काढली. काहीही केलेले नाही. जेव्हा दि. १५ एप्रिलला पहिल्यांदा केस बोर्डावर आली त्यांनी ऑर्डरमध्ये काय म्हटलेले आहे ते बघा. आर्डर बिलो एग्झिब्युट यु टू बिफोर फायालिंग कम्प्लेंन्टस् कम्प्लेनन्ट हॅव्ह सर्व्ह नोटीस टू दी रिस्पॉन्डन्ट ऑन १५/०४/२००५. दे आर मुव्हिंग इन्टरीम ॲप्लीकेशन ऑन दि २१/०४/२००५. म्हणजे त्या तीन कर्मचाऱ्यांनी १५ तारखेला लेखी नोटीस दिलेली आहे. त्यांना ती मिळालेली नाही. त्यांनी ह्यांनी सुचविलेले आहे की, आम्ही २१ तारखेला मुव्ह करतो. रोज कोर्टापुढे येत आहे की, आम्हांला इन्टरिम रिलिफ मिळावा. त्या स्थायी समितीच्या ठरावावर पुढे महानगरपालिकेने ॲक्ट करावे. डिस्पाइट सर्व्हिस, नन अपिअर्ड ऑन बिहाफ ऑन रिस्पॉन्डन्ट ऑन दि २१/०४/२००५ आणि दि. १५/०४/२००५ ला नोटीस मिळाली असूनसुद्धा २१/०४/२००५ पर्यंत आमचा विधी विभाग झोपलेला होता. दि. २१/०४/२००५ ला सुद्धा आमचे कोणीही वकिल ह्या ठिकाणी हजर राहिलेले नाहीत. त्याच्यापुढे कोर्ट असे म्हणते की, हाऊएव्हर दीस कोर्ट ऑब्टेन हेअरिंग श्री. एल. ए. सावंत लर्नेर ॲडव्होकेट इश्युड सो फार नोटीस टू दी रिस्पॉन्डन्ट रिटर्नेबल ऑन दि २८/०४/०५ . म्हणजे न्यायालयाने खरे म्हणजे त्यावेळेला तसा आदेश दिला असता की, ह्या कर्मचाऱ्यांचा स्थायी समितीने घेतलेला निर्णय बरोबर आहे. तरीसुद्धा न्यायालयाने पुन्हा एकदा आमच्या महापालिकेला चान्स दिला आणि त्यांना सांगितले की, तुम्ही २८ तारखेला हजर व्हा. नाहीतर आम्ही एकतर्फी निकाल देऊ. पुन्हा २८ तारखेचे काय झाले ते बघा. बेलिफ रिपोर्ट शोज दॅट, नोटीस इज सर्व्हड अप ऑन दी रिस्पॉन्डन्ट ऑन दि २८/०४/०५. बेलिफचा रिपोर्ट आहे दि. २८/०४/०५ ला बेलिफने जो रिपोर्ट सादर केलेला आहे. तरीसुद्धा आमच्या महापालिकेतर्फे कुठलाही वकिल हजर झालेला नाही. आता सहाय्यक आयुक्त श्री. मनाळे साहेबांनी असे स्टेटमेंट केले की, त्यांचे वकिल श्री. जाली सादगी यांना त्यांनी इन्फॉर्म केले. इन्फॉर्म करण्याची काय रित आहे ती आम्हांला माहिती नाही. जर एखाद्या वकिलाकडे आपल्या अनेक केसेस असतील तर एकच वकिल सगळ्या केसेसला जात नाही. त्यांच्या चेंबरमध्ये पन्नास वकिल असतात. मा. महापौर मॅडम, त्यांच्या चेंबरमध्ये हे दाव्याचे कागदपत्र पाठविल्याची तारीख आपण स्वतः तपासून पहावी. तुम्हांला आश्चर्य वाटेल की, जेव्हा दि. २८/०४/२००५ ला कोर्ट बसले तेव्हा कोर्टानेसुद्धा विचारले की, महापालिकेला नोटीस दिलेली आहे का? महापालिकेला नोटीस दिलेली आहे. बेलिफचा रिपोर्ट बेलिफने सांगितले की, आमच्याकडे नोटीस बजावल्याची पोच आहे. तरीसुद्धा आमचे कोणीही वकिल त्या ठिकाणी हजर नाही. २.४५ वाजता कोर्ट बसले. २.४५ वाजता कोर्टाने विचारले की, महापालिकेतर्फे कोणी हजर आहे

का? तोपर्यंत आमचा विधी विभाग झोपला होता. ४ वाजता श्री. जाली सादगी साहेब यांचे असिस्टन्ट कोर्टामध्ये आले. विधी अधिकाऱ्यांनी त्यांच्या हातामध्ये पेपर दिले. कोर्टाने २.४५ वाजता निकाल दिला. त्या कर्मचाऱ्यांच्या बाजुने. स्थायी समितीने त्या कर्मचाऱ्यांचा ठराव केला होता. मा. आयुक्त साहेबांनी तो ठराव सस्पेन्ड करायला पाठवलेला होता. विधी विभागाच्या कामकाजाची एकंदरीत पद्धत बघा. आमच्या विरोधात एक निर्णय केला. या निर्णयाने कोण बाधित झाली होती, तर महापालिका झाली होती. महापालिकेने अपिल करायला पाहिजे होते. महापालिका अपिल करित नाही. जो अधिकारी बाधित होता तो अधिकारी अपिल करतो. श्री. किरण राठोड हे कोर्टात गेले. त्यांनी कोर्टामध्ये ह्या निर्णयाच्या विरोधात अपिल केले. आम्ही त्याही दाव्यामध्ये विरुद्ध आहोत. म्हणजे महापालिका पहिल्याही दाव्यात प्रतिवादी आहे. आता जेव्हा श्री. जाली सादगी तुमच्याकडे जर काम करत नसेल तर ते तुमच्या रेकॉर्डवर आले असेल. तर श्री. जाली सादगी यांना काढून दुसरा वकिल नेमायचा. ही बाब योग्य समजुया. परंतु, श्री. जाली सादगी यांच्या असिस्टंन्टकडे किंवा श्री. जाली सादगी यांच्याकडे पहिल्या केसचा निकाल लागेपर्यंत कागदपत्रे दिलेली नाहीत. कोर्टाने जाणुन-बुजून एकतर्फी निर्णयात देण्यासाठी या विधी विभागाचे पुर्वीच्या रिटायर न्यायाधिशाने हे सगळे वातावरण निर्माण केले. इतक्या वरती हे न्यायाधीश महाराज थांबले नाहीत. हे प्रथम न्याय देणारे ज्युनिअर डिव्हीजनचे रिटायर जज यांची हयात एकाच ठिकाणी गेली. म्हणजे ते ज्युनिअर डिव्हिजनचे जज म्हणून या सेवेत आले आणि ज्युनियर डिव्हिजनचे जज म्हणून रिटायर झाले. आपण पदोन्नतीवर केवढ्या माताबुट्या केल्या. म्हणजे गव्हर्नमेंटने यांना पदोन्नतीला चान्स दिला नाही. कदाचित त्यांनी मोठ्या मनाने मागितली नसेल. मी त्यांच्या कार्यप्रणालीवर टिका करीत नाही. परंतु, सरकारचा एक रेकॉर्ड असा दाखवितो की, एक अधिकारी किंवा एक जज ज्या पोस्टवर अपॉईन्ट झाला त्याच पोस्टवर तो रिटायर झाला. आता तो जज आमच्या सेवेला आहेत. जेव्हा श्री. किरण राठोड उच्च न्यायालयामध्ये ह्या निर्णयाच्या विरोधात गेले ते महापालिकेच्या बाजून गेले नाहीत. महापालिका कोर्टात गेलेली नाही. म्हणजे इकडे यांना सांगतात की, तुम्ही कुस्ती लढा आम्ही कपडे सांभाळू. ही यांच्या विभागाची काम करण्याची एक प्रकारे वृत्ती आहे. इतकेच नव्हे तर जेव्हा तुम्ही श्री. जाली सादगी यांना रेकॉर्डवरुन काढून दुसरा वकिल नेमला. या ठिकाणी महापालिकेतर्फे एक वकिल नेमलेला आहे. विधी विभागाचा इतका गैरव्यवहार, गैररित्या कारभार चाललेला आहे याची मलासुध्दा कल्पना नव्हती. श्री. शिवकर नावाचे जे वकील होते त्यांना विधी विभागाने वकीलपत्र दिले. त्या वकीलपत्रावर कोणाची स्वाक्षरी आहे ते बघा. वकीलपत्रावर कोणाची स्वाक्षरी असावी लागते. एकातर मा. आयुक्त साहेबांनी किंवा मा. आयुक्त साहेबांनी आस्थापनेचा कार्यभार ज्यांना दिलेला आहे त्यांची वकीलपत्रावर सही असावी लागते. परंतु विधी विभागातील एका कर्मचाऱ्याची तेथे स्वाक्षरी आहे. इतकेच नव्हे तर मनाळे साहेबांनी स्पष्टपणे सांगावे की, या केसमध्ये जे रिटर्न स्टेटमेन्ट फाईल केलेली आहे. त्याच्यावर तरी साहेब आपली सही आहे का?

**रमेश मनाळे :-**

त्याच्यावर माझी सही आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

बरे झाले यांनी खरे सांगीतले. आता आपण हेसुध्दा सांगा की रिटर्न स्टेटमेन्टच्या बाबतीत कोर्टाने जे डिसीजन दिलेले आहेत ते तुम्हाला मान्य आहेत का? आपण असे म्हटलेले आहे की अजून एक पाचवी उप अभियंतेची जागा रिक्त आहे, असे आपल्या स्टेटमेन्टमध्ये म्हटलेले आहे. तुम्ही साईन केलेली आहे हे सांगितल्यामुळे प्रश्न मिटला. नाहीतर आपण जेव्हा आपल्या रिटर्न स्टेटमेन्टमध्ये असे म्हटले पाहिजे की पाच उप अभियंतांची जागा खाली आहे तेव्हा कोर्टाने असा निर्णय दिला की, श्री. राठोड यांना पाचव्या जागेवर नियुक्त करायला काय हरकत आहे. मला या ठिकाणी एकच सांगायचे आहे की, कुठल्या कर्मचाऱ्याला न्याय देण्यासाठी गैररित्या, त्याच्या वैयक्तीक फायद्यासाठी गैररित्या या महापालिकेचा वापर विधी विभाग करत आहे. तर आम्हाला ही बाब कुठेतरी वरच्या लेव्हलला न्यावी लागेल. वैयक्तीक लेव्हलला नव्हे तर प्रशासनाच्या वरच्या लेव्हलला किंवा न्यायालयामध्ये अशा प्रकारचे इन्टरवेन्शन करुन या अधिकाऱ्यांचा ह्याच्या मागचा काय हेतु आहे हे सांगावे लागेल. जे पाचवे पद खाली आहे आहे ते पद ऑलरेडी श्री. बारकुंड, श्री. खांबित हे सगळे पदावर आहेत. बाकीचे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आलेले आहेत. जे खाली पद आहे लेखी निवेदन किंवा रिटर्न स्टेटमेन्ट फाईल करणारे समजतात की श्री. राठोड ही व्यक्ती त्याच्यासाठी सक्षम आहे. मला या ठिकाणी विधी अधिकाऱ्यांनी सांगायचे आहे की पाचव्या उपअभियंत्याचे जे पद आहे ते विद्युत अभियंत्याचे आहे. श्री. राठोड हे ती शैक्षणीक पात्रता धारण करतात का? याचा अर्थ असा आहे की कुठेतरी वैयक्तीक फायद्यासाठी आमचा अख्खा विधी विभाग विकला गेलेला आहे. अक्षरशा भ्रष्टाचारी झालेला आहे. यांचा या ठिकाणी मी इन्सल्ट करतो. इतकेच नव्हेतर श्री. शिवकर नावाचा अभियोक्ता जो वकील नेमला तो वकील आमच्या महानगरपालिकेच्या विरोधात आमच्या कर्मचा-यांच्या केस लढवतो. जो श्री. शिवकर वकील महापालिकेच्या विरोधात केस लढतो. त्याला वकीलपत्र देणे योग्य आहे का? त्या वकीलाला वकीलपत्र देण्यासाठी विधी अधिकाऱ्यांनी किती पैसे दिलेले आहेत. इतकेच नव्हे तर ह्या विधी अधिकाऱ्यांनी ह्याच्याचुढे जाऊन कळस केला, ह्यांनी जे वकील नेमले त्यांची नावे वाचून दाखवितो. आपण मघाशी अग्नीशमन

अधिकाऱ्यांचा सन्मान केलात मला वाटते की ह्या विधी अधिकाऱ्यांना वीरचक्र देण्याची पाळी आलेली आहे. सौ. सुधा बनसोडे ह्या वकील नेमलेल्या आहेत, ह्या कोण आहेत? ह्यांची मुलगी आहे. श्री. विजय साही हे त्यांचे नातलग जावई आहेत. जर विधी अधिकाऱ्याला हे सगळे अभियोक्ते वकील नेमण्याचे अधिकार असतील तर मला वाटते की तुम्ही तुमच्या वतीने न्यायालयात सगळे वकील नेमुन तुमच्या आमच्या प्रॉपर्टीलासुध्दा दुसऱ्याच्या नावाने करतील. हे महापालिकेची काय सुरक्षा करतील आपण ह्या बाबींची गंभीर दखल घ्यावी. मा. महापौर मॅडम तुम्ही सुशिक्षित आहात. तुम्हाला कायदा वाचता येतो. तुम्हाला माहिती आहे ते बघा. आम्ही तसे समजतो. तुमची ती समजून घ्यायची वृत्ती आहे. बऱ्याच लोकांची नसते परंतु, तूमची आहे. तुम्ही तेवढा वेळ देता. हा विषय विषयपटलावर येताना ह्या विषयाचे गांभीर्य आपण समजून आमचा विषय ऐकला. आस्थापनेमधील श्री. रमेश मनाळे यांचे डायरेक्ट हे नसेल. विधी अधिकाऱ्यांनी स्टेटमेन्ट तयार करताना ह्याचा विचार करायला पाहिजे होता. हा विधी सल्लागार आहेत तशा अवस्थेमध्ये एका क्षणामध्ये ह्यांना कुठलीही मुदतवाढ न करता ह्यांना मानसन्मान देऊन, वीरचक्र देऊन यांना या पालिकेच्या बाहेर काढून टाका अशी मी या ठिकाणी आपल्याला सूचना करतो.

**शशिकांत भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अनधिकृ बांधकाम विभाग व इतर विभागातील न्यायालयीन कामकाजासंदर्भात कार्यवाही शीघ्रतेच दृष्टीने होण्याकरीता श्री. साळवे, निवृत्त न्यायाधिश यांना मानधनावर विशेष कार्य अधिकारी नियुक्त केलेले आहे. श्री. साळवे यांनी महानगरपालिके विरुद्ध दाखला होणाऱ्या दाव्यामध्ये त्वरीत कार्यवाही करुन स्थगिती उठविणे, अनधिकृत बांधकामबाबत न्यायालयासमोर महानगरपालिकेची बाजू मांडणे हि कामे करावयाची होती, परंतु त्यांच्या काळात स्थगिती घेऊन अनधिकृत बांधकाम होण्याचे प्रमाण वाढलेले असून स्थागिती असताना देखील संबंधित बांधकामे सुरु ठेऊन पूर्ण करतात परंतु श्री साळवे यांनी सदर बांधकामाबाबत Contept of Court दाखल न केल्याने बांधकामे पूर्ण होत आहेत. आस्थापना विभागातील कर्मचाऱ्याच्या औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यामध्ये (दावा क्र. २०४/२००५) तर त्यांनी गेली १३ वर्ष महानगरपालिकेने नेमलेले वकील श्री अविनाश जालीसद्गी यांना हटवून महानगरपालिकेच्या विरुद्ध निर्णय लागण्याकरिता श्री. शिवबर या महानगरपालिके विरुद्ध लढलेल्या वकीलालाच महानगरपालिकेचा वकील नेमला व न्यायालयात महानगरपालिकेची कोनतीही बाजू समर्थपणे न मांडता व कागदपत्र न दाखविल्यामुळे सदर दावा महानगरपालिकेच्या विरुद्ध गेलेले आहेत. श्री साळवे हे अत्यंत अकार्यक्षम आहेत.

तसेच अनधिकृत बांधकाम विभागात श्री रमेश मनाळे यांना सहाय्यक आयुक्त म्हणून नेमलेले असुन त्यांच्या काळात शहरातलि अनधिकृत बांधकामे वाढलेली असून घोडबंदर येथे नॅशनल हायवे लगत संरक्षण भिंत कोसळून मृत्यूमुखी पडलेले ५ मजूर तसेच मिरा-गावठण येथे अनधिकृत पणे नाल्यावर बांधलेल्या चाळी कोसळून मृत्यूमुखी पडलेल्या ९ नागरीक या सर्वांना अनधिकृत बांधकाम विभागच जबाबदार आहे. तरी या सर्व गोष्टींचा विचार करता श्री साळवे, विशेष कार्य अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे तसेच श्री रमेश मनाळे, सहाय्यक आयुक्त यांना देखील विभागीय चौकशीच्या अधिन राहून महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्ती वरील सेवेतून त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे असा ठराव मांडीत आहे.

**नयना म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब आपल्याला आपण विचारलेल्या प्रश्नांची माहिती हवी होती. आपण कुठल्या आधारावर हा ठराव मांडलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

ठराव मांडलेला आहे, कारण असे अकार्यक्षम अधिकारी असतील तर ह्या महापालिकेचे दुर्दैव आहे. हे ही महापालिका कधी विकून जातील हे तुम्हाला आम्हाला कधी कळणार नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही ठराव मांडण्यासाठी पीठासीन अधिकाऱ्यांची संमती घेतलेली नाही. तुम्हाला तोंडी माहिती हवी होती. तुम्ही डायरेक्ट ठराव कसा मांडला.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही तुमच्या संमतीने प्रश्न विचारलेला आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हांला तोंडी माहिती देण्यात येईल असे सांगितले होते तुम्ही या ठिकाणी ठराव मांडलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुमच्या संमतीने ठराव मांडलेला आहे असे मी जाहिर करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, हे जे सगळे झाले ह्याच्यमध्ये अधिका-यांनी जी कृती केलेली आहे. त्याला आपले समर्थन आहे का? याला समर्थन आहे असे आम्ही समजावे का? जी चुकीची गोष्ट दिसते ती मी आपल्या निदर्शनास आणलेली आहे. योग्य आहे की अयोग्य आहे आपण याचा निर्णय घ्यायचा आहे. आम्ही आमचा ठराव तुमच्याकडे दिलेला आहे. ही न्यायालयीन बाब आहे. आपण ह्याच्यामध्ये कोणाला वाचवले तर आपण सगळे याच्यामध्ये अडचणी येऊन योग्य वेळेला योग्य ठिकाणी विषयपत्रिका जरी नसली तरी आम्ही आमचा ठराव दिलेला आहे. लोकांच्या हिताच्या दृष्टीने आणि सगळ्या नगरसेवकांच्या हिताच्यादृष्टीने तो बरोबर आहे. आपण स्वतः पिठासीन अधिकारी आहात. जे घडलेले आहे ते आम्ही आपणांस कळविलेले आहे. आपण ह्याच्यावर निर्णय द्यावा. योग्य आहे की अयोग्य आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की सभागृहाचे कामकाज चालु असताना सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी त्यांच्या मागच्या सभेतील शंका किंवा त्यांच्या विचाराबाबत स्पष्टीकरणाची मागणी केलेली होती. आपण ती चांगल्याप्रकारे रेग्युलर विषयावर हे शेवटी घेण्यात येईल असे साधारणपणे सांगितले अशी आमची धारणा आहे. मागच्या सभागृहाची अशी धारणा आहे की हा विषय फक्त तपशिल व त्याच्या खुलाश्याशी संबंधित होता. हा विषय ठरावाच्या रुपात मांडण्यासाठी त्यांनी सांगितलेले आहे अशी सभागृहाची धारणा नाही. त्यामुळे आपण या ठरावाला परवानगी दिलेली आहे असे याठिकाणी व्यक्त होत नाही. त्यांनी ज्या काही सुचना केलेल्या असतील त्याची फक्त नोंद घेण्यात यावी असे आम्ही सांगत आहोत. विशेष करून एखाद्या अधिकाऱ्याबद्दल असे बोलणे योग्य नाही. उदा. श्री. साळवे जे विधी सल्लागार आहेत त्याच्याबद्दल ज्या सन्मा. सदस्यांचे, ज्या राजकीय पक्षाचे भुमिका त्यांनी व्यक्त करणे हे चुकीचे आहे असे आम्ही मानत नाही. त्यांच्या कामात असलेली त्रुटी, त्यांच्या कामात असलेली कमतरता सन्मा. सदस्यांनी सभागृहात मांडलेली आहे. त्याच्यावर चर्चा झाली तर होऊ शकते. लगेच त्या अधिकाऱ्याला कामावरून काढून टाका अशा स्वरूपाचे कुठल्याही अधिकाऱ्याबाबत वकतव्य होणे चुकीचे आहे. असे काय असेल तर ते रेग्युलर विषयामध्ये घ्यावे आणि त्याचा त्यावेळी निकाल लावावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम याठिकाणी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता तसेच महानगरपालिकेच्या विरोधात न्यायालयात गेलेले कर्मचारी हे सर्व तपशिलवार माहिती याठिकाणी दिलेली आहे. त्या अनुषंगाने सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी हा ठराव मांडलेला आहे आणि त्यांच्या सन्मा. सदस्यांनी अनुमोदन दिलेले आहे. परंतु, ही चर्चा करत असताना आपल्याकडून काही माहितीची अपेक्षा होती आपण त्याप्रमाणे माहिती दिलेली आहे. परंतु, हा ठराव मांडताना एखाद्या अधिकाऱ्यावर ॲक्शन घेणे तो अकार्यक्षम किंवा कसा ही असो त्याच्यामुळे इतर अधिकाऱ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण त्या दृष्टीने या सभागृहामध्ये त्यांचा जो ठराव आहे आपण त्याबाबत पीठासीन अधिकारी म्हणून निर्णय घ्या परंतु, माझे असे सजेशन आहे की, जर ही न्याय प्रविष्ठ बाब बेकायदेशीरपणे जो काही कारभार चाललेला आहे मग ते अतिक्रमण असो वा विधी अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती देवून कोर्टाचा निकाल वन साईड कर्मचाऱ्यांना मिळविण्यासाठी जी मदत केलेली आहे त्या गोष्टीचा विचार करण्यासाठी उपायुक्त लेव्हलवर एक समिती नियुक्त करावी त्या अनुषंगाने चौकशी करावी. ह्या विधी अधिकाऱ्यांकडे तात्पुरत्या स्वरूपात पुढील कारभार देवू नये. त्यांची मुदतवाढ संपले त्यावेळेला आपण पुढील कार्यवाही करावी. तोपर्यंत त्यांना कुठलेही काम सोपवू नये अशी मी याठिकाणी सुचना मांडतो.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी याठिकाणी आपले विचार मांडतो. ज्याप्रमाणे जनार्धन घंगाळे नावाच्या व्यक्तीने कोर्टामध्ये चुकीची माहिती देवून जो काही स्टेटस्को मिळविला त्यांनतर महापालिकेने मिस्लेनिअस अपील फाईल केला. तो मिस्लेनिअस अपील देखील आपल्या विरोधात गेल्यामुळे आपल्याला हायकोर्टात जावे लागले. हाय कोर्टामध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी वारंवार या सभागृहात सांगितल्यानंतर अनेकवेळा लेखी मागणी नंतर विषय सभागृहापुढे आला. तत्कालिन नगरविकास राज्यमंत्री श्री. सुनील तटकरे साहेबांनी आपल्याला, या सभागृहाला आदेश देवून मायनर चेन्जेस करा असे सांगितले. हा मायनर नव्हता, तो मेजर होता. सत्ताधारी त्यांच्या संख्याबळीच्या जोरावर त्यांनी तो ठराव पास करून घेतला. श्री. मिलन म्हात्रे आणि मी स्वतः, आमच्या पक्षाचे नगरसेवक आम्ही मंत्रालयात पाठपुरावा करून तो ठराव मा. आर. आर. पाटील साहेब (उपमुख्यमंत्री सो.) श्री. रामानंद तिवारी (प्रधान सचिव), श्री. ना. भा. पाटील सो. (प्रधान सचिव) तसेच मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख ह्यांनी पर्सनली भेटून कोणी एखादा मंत्री चुकीचा निर्णय घेत असेल की, टाऊन पार्क सारख्या एक सिंगल रिझर्व्हेशन बदलून त्या ठिकाणी एखाद्या अनधिकृत शाळेला अनधिकृत बांधकाम केलेल्या शाळेला परवानगी देत असेल तर तो विषय आला. त्यावेळेला विधी सल्लागारांनी या सभागृहाला चुकीची माहिती दिली. माझ्याकडे लिगल ओपीनियन आहे. हायकोर्टामध्ये दिलेली लिगल ओपिनियन मी आपल्याला सांगू इच्छितो की, शांतीनगरमध्ये श्री. अशोक शेट्टी नावाचा फ्लटमध्ये राहणारा

माणूस टॅक्स पावत्या कम्प्युटरमध्ये काढून बनावट पावती बिल बनवून मिरा रोडच्या विभागीय कार्यालयामध्ये जावून पैसे भरले आणि चुकीची पावती त्या माणसाने घेतली आणि कोर्टामध्ये स्टेटस्को मिळविला. गिव्हन ॲनी फॉल्स इनफॉरमेशन बिफोर दि कोर्ट इज अल्सो अ पर्जुरी. परंतु, आपले लिगल डिपार्टमेंट तेवढे सक्षम नसल्यामुळे शेवटी महानगरपालिका ही एक लोकल बॉडी असल्यामुळे हायकोर्टाने त्याच्यावर फार सिरीअस आदेश दिला की, कुठल्याही परिस्थितीमध्ये दि. ३१ डिसेंबर, २००५ ला ठाणे न्यायालयाने त्याप्रकरणात निर्णय द्यावा. आपल्या महानगरपालिकेचे वकील श्री. अशोक कुलकर्णी ह्यांना पाहिजे ती माहिती दिली जात नाही. ते तिथे पोटतिडकीने लढत आहेत. परंतु, त्यांना जे कागदपत्र पाहिजे त्या गोष्टी महानगरपालिका देत नाही. उलट त्यांना काम देणे बंद केलेले आहे. कारण ते वकील सिनसीअर आहेत. कारण श्री. अशोक कुलकर्णी महानगरपालिकेत आपली बाजू मांडत आहेत. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी ह्या सभागृहाला जो रेकॉर्ड जमा केलेला आहे. दि. ३ ऑगस्ट, २००४ रोजी काय झाले? ते आपणा सर्वांना माहित आहे. एका इललिगल कन्स्ट्रक्शन करण्याऱ्या ट्रस्टीवर त्या संस्थेच्या अध्यक्षा श्रीम. मिनी जनार्दन घंगाळे ह्यांच्यावर देखील एम.आर.टी.पी. चा गुन्हा दाखल झाला. मिरा रोड पोलीस स्टेशनमध्ये श्री. विजय पाटील जे आपले कर संकलन आणि व्हॅल्युअर अधिकारी आहेत त्यांनी देखील गुन्हा दाखल केलेला आहे ते लिगल प्रोसीडिंग अजून पेन्डींग असताना लिगल ओपिनियन काय करतात? अशा लिगल ओपिनियनमुळे २७ नगरसेवक बाद झाले असते. आम्ही थोडेसे स्लो झालो आहोत आपण त्या ठरावावर मतदान केलेले आहे. आपल्याला देखील पटले आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला त्या ठरावावरची माहिती अपेक्षित होती. ती माहिती मिळालेली आहे. मी ठराव मांडण्याची संमती दिलेली नव्हती.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण या ठिकाणी नियम विचारल्यामुळे मी मघाशी आपल्याला बोललो की, ह्या ठिकाणी जी परिस्थिती आहे ती सत्य परिस्थिती त्यांनी कथन करायला पाहिजे. त्यांनी सत्य परिस्थिती सांगितलेली नाही. त्या परिस्थितीशी सुसंगत असे त्यांनी सांगितलेले आहे. कदाचित मी दिलेली माहिती चुकीची असु शकेल अशी जी शंका सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले ह्यांनी बोलून दाखविली, सांगितलेली शंका चुकीची असेल असे सर्वांचे मत असू शकते. त्याला न वाचवणारे, वाचवणारे सर्वांचे असू शकेल. आम्हाला नियमाप्रमाणे ठराव मांडता येत नाही. ह्या ठिकाणी सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले ह्यांनी अतिशय सुचकरित्या सांगितले की, अशा सर्व प्रकरणांची चौकशी उपायुक्तांद्वारे होणे महत्त्वाचे आहे. त्याच्यावर ते दोषारोप ठेवण्यात यावे. याठिकाणी जो ठराव मांडला आम्ही त्याच्यामध्ये बदल करतो. आजच्या तारखेला ही वस्तुस्थिती सभागृहामध्ये आणलेली आहे. सभागृह या निर्णयाप्रत गेलेले आहेत. अधिकारी कुठेतरी दोषी आहेत. या संपुर्ण केसेसमध्ये अधिकाऱ्यांचा काय रोल आहे या बाबींचाी तपासणी आपण उपायुक्त आस्थापना विभाग किंवा मुख्यालय ह्यांच्याकडून आपण चौकशी करावी. त्यांनी आपल्याला त्या चौकशीचा रिपोट सादर करावा. आपल्या स्तरावर या अधिकाऱ्यांबाबत निर्णय घ्यावा. तेव्हा आपण या ठरावाला सुचना रूपात घ्यावे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांची समिती नेमुन सखोल चौकशी करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

खाली माझी स्वतःची स्वाक्षरी आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील बोलले त्यांच्याशी मी सहमत आहे.

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०५.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**